


सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १२६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १० जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## देशाच्या नेतृत्त्वाने सुसंवादाची स्थिती ठेवली नाही, त्याची किंमत देश देतोय; शरद पवारांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०पुणे**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २६ व्या वर्धापनदिनानिमित्ताने पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिर येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा मेळावा पार पडला. यावेळी शरद पवार यांनी पहलगाम हल्ल्यानंतर राबवण्यात आलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'चे समर्थन केले. पहलगाम हल्ल्यानंतर आम्ही सरकारवर टीका केली नाही, तर सरकारच्या भूमिकेचे समर्थन केले असं शरद पवार म्हणाले. मात्र यावेळी शरद पवार यांनी देशाच्या शेजारील देशांमध्ये असलेल्या परिस्थितीवरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारला आरसा दाखवला आहे. देशाचे नेतृत्व करणाऱ्यांनी शेजारील देशांसोबत सुसंवादाची स्थिती जाणीवपूर्वक निर्माण केली नाही, अशी टीका शरद पवार यांनी केली.



पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन वर्धापनदिन सोहळे पार पडत आहे. पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिर येथे शरद पवार गटाचा वर्धापन दिन सोहळा पार पडला. यावेळी शरद पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड यांच्यासह महत्त्वाच्या नेत्यांनी हजेरी लावली होती. यावेळी भाषण करताना शरद पवार यांनी देशाच्या शेजारील देशांसोबतच्या संबंधावर लक्ष वेधले.

यावेळी पवार यांनी पंतप्रधान मोदींचा उल्लेख न करता निशाणा साधला. ज्या बांग्लादेशसाठी भारताने त्याग केला तोसुद्धा आपल्यासोबत नाही, असं शरद पवार म्हणाले.

राष्ट्राच्या हितामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस कधी राजकारण करणार नाही. पहलगाममध्ये काही नागरिकांची हत्या केली गेली आणि त्याच्यामागे कोण आहे याची चर्चा देशभरात झाली. त्यावेळी आम्ही सरकारवर टीका केली नाही. आम्ही सांगितलं की या देशाच्या भूमीवर नागरिकांवर हल्ले होत असतील तर शासनाने कोणतीही भूमिका घेतली त्याचे समर्थन आम्ही करू. याच्यामध्ये राजकारण आणणार नाही असं सांगितलं. आज गांभीर्याने या सगळ्या प्रश्नांचा विचार व्हायला हवा, असं शरद पवार यांनी म्हटलं.

## नीट पीजी परीक्षा ३ ऑगस्ट रोजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० मुंबई**

दोनऐवजी एका सत्रात परीक्षा घेण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढे ढकलण्यात आलेल्या पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या (नीट पीजी) परीक्षेची तारीख राष्ट्रीय वैद्यकीय शास्त्र परीक्षा मंडळाने (एनबीईएमएस) जाहीर केली आहे. त्यानुसार नीट पीजी परीक्षा ३ ऑगस्ट रोजी होणार आहे. यासाठी परीक्षा केंद्र पसंतीक्रम नोंदविण्यासाठी १३ ते १७ जूनपर्यंत मुदत देण्यात येणार आहे.




पर्सेंटाईलमुळे होणारा गोंधळ लक्षात घेऊन वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी नीट पीजी परीक्षा देणाऱ्या दोनऐवजी एका सत्रात घेण्यासाठी न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार एनबीईएमएसने नीट पीजी परीक्षा एकाच सत्रामध्ये घेण्याचा निर्णय घेऊन ही परीक्षा ३ ऑगस्ट रोजी घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. परीक्षा एकाच सत्रामध्ये घेण्यासाठी एनबीईएमएसने परीक्षा केंद्र असलेल्या शहरांमध्ये वाढ केली आहे. तसेच सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे परीक्षा केंद्र निवडण्यासाठी शहर निवडण्यासाठी पुन्हा अर्ज करावा लागणार आहे. हा अर्ज करण्यासाठी उमेदवारांना १३ जून रोजी दुपारी ३ नंतर संकेतस्थळावर पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना १७ जून रोजी रात्री ११ वाजून ५५ मिनिटांपर्यंत शहरांचा पसंतीक्रम भरता येणार आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी निवडलेल्या शहरातील परीक्षा केंद्राची एनबीईएमएसद्वारे वाटप करण्यात येणार आहे.

परीक्षेसाठीच्या शहरांची निवड ही प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर करण्यात येणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या अर्जामध्ये नाव, श्रेणी, राष्ट्रीयत्व, ई-मेल, मोबाइल क्रमांक आणि परीक्षेचे शहर वगळता अन्य माहिती व कागदपत्रे संपादित करण्यासाठी २० ते २२ जूनपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना २१ जुलै रोजी परीक्षा शहराची माहिती कळविण्यात येणार आहे. त्यानंतर, ३१ जुलै रोजी विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. त्यामध्ये विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्राची माहिती देण्यात येणार आहे. तसेच परीक्षेचा निकाल ३ सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात येणार असल्याचे परीक्षा एनबीईएमएसद्वारे कळवण्यात आले आहे.

## कोणाचाही बाप काढणं, मुख्यमंत्री फडणवीसांची नितेश राणेंना समज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होण्याआधीच महायुतीमधील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. मत्स्य व बंदरे विभागाचे मंत्री व भाजपा नेते नितेश राणे यांनी धाराशिवमध्ये केलेल्या एका वक्तव्यामुळे शिवसेना (शिंदे) व भाजपात सारं काही आलबेल नसल्याचं चित्र पाहायला मिळालं. पाठोपाठ त्या वक्तव्यामुळे राणे बंधूंमध्ये (नितेश व निलेश राणे) वादाची ठिणगी पडली. हे प्रकरण एवढ्यावरच थांबलं नाही. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील यावर भाष्य केलं आहे. फडणवीस यांनी नितेश राणे यांना या प्रकरणावरून समज दिली आहे.

धाराशिवमधील एका कार्यक्रमात बोलताना नितेश राणे यांनी राज्यात भाजपाचे सरकार असल्याचे लक्षात ठेवावे, सगळ्यांचा बाप म्हणून भाजपचा मुख्यमंत्री बसलाय हे सगळ्यांनी लक्षात



ठेवा, असं वक्तव्य केलं होतं. त्यांचा रोख स्थानिक शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) नेत्यांना होता. त्यावरून शिंदे गटातील नेत्यांनी त्यांची नाराजी जाहीरपणे व्यक्त केली. परिणामी शिवसेनेचे आमदार निलेश राणे यांनी नितेश राणे यांना एक्सवर एक पोस्ट करून टीका केली. हे प्रकरण एवढ्यावरच थांबलं नाही. आज (१०) जून स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची दखल घेत नितेश राणे यांना जाहीरपणे समज दिली आहे.

## अमरावती जिल्ह्यातील ग्रा.पं. च्या सार्वत्रिक अन् पोटनिवडणूक केव्हा होणार?

### २६ मार्चला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध, गावागावांत निवडणुकीची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

जिल्ह्यात ४ ग्रापंमध्ये सार्वत्रिक, ६ मध्ये थेट सरपंच व १२५ ग्रापंमध्ये अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी २६ मार्चला करण्यात आली. निवडणूक आयोगाचे प्रचलित निकषानुसार अंतिम यादीच्या प्रसिद्धीनंतर लगेच निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जातो. या वेळी मात्र अडीच महिन्यापासून कार्यक्रम जाहीर न झाल्याने इच्छुकांची प्रतीक्षा करावी लागत आहे.

मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक तसेच रिक्त थेट सरपंचपद व सदस्यपदांच्या पोटनिवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाद्वारा मतदार यादीचा कार्यक्रम राबविण्यात आला व या कार्यक्रमानुसार २६ मार्च २०२५ रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांद्वारा करण्यात आली. त्यामुळे लगेच निवडणूक जाहीर होण्याची अपेक्षा या गावांमध्ये होती. प्रत्यक्षात आतापर्यंत आयोगाद्वारा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे या गावात आता वेगवेगळ्या चर्चा होत आहे.

**या ग्रामपंचायतींमध्ये सार्वत्रिक निवडणूक**

वरुड तालुक्यात जरुड व शहापूर, अचलपूरमध्ये खेलदेवमाळी व चिखलदरा तालुक्यात रुईपठार या ग्रामपंचायतींमध्ये सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. शिवाय आखतवाडा, वणी ममदापूर, खोलापूर, सर्फापूर व अन् दोन ग्रामपंचायतींमध्ये थेट सरपंचासाठी पोटनिवडणूक व अन्य १२५ ग्रामपंचायतींमध्ये रिक्त १८९ सदस्यपदांसाठी पोटनिवडणुकीच्या कार्यक्रमाची प्रतीक्षा होत आहे.

## राज्य सरकारचा मोठा निर्णय, पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात १०००० रूपयांची वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

देवेंद्र फडणवीस सरकारने विद्यार्थ्यांच्या विद्यावेतन वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ३ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आला आहे. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात भरघोस वाढ करण्यात आली आहे. पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात १०००० रूपयांची वाढ करण्यात आली आहे. बीएससी नर्सिंग आणि व्यवसायोपचार अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनाही विद्यावेतनात वाढ मिळणार आहे.



या निर्णयामुळे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. आज मंत्रिमंडळात देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

**मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेले ३ महत्त्वाचे निर्णय कोणते?**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा. आगामी विधिमंडळ अधिवेशनात विधेयक आणणार (सामाजिक न्याय विभाग)

राज्यातील शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात ६२५० रुपयांची वाढ, पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात १०,००० ची वाढ, तर बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनाही मिळणार ८,००० विद्यावेतन (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग)

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूल वाढीच्या दृष्टीने उपाय. विविध प्रकारच्या दरांमध्ये सुधारणा (राज्य उत्पादन शुल्क विभाग)

## राहुल गांधींसोबत डिबेट करण्यासाठी माझी गरज नाही आमचा कार्यकर्ताही पुरेसा - मुख्यमंत्री फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई**

मी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या प्रत्येक प्रश्नाला पुराव्यासह उत्तर दिलं आहे. खरं म्हणजे राहुल गांधींसोबत डिबेट करण्यासाठी माझी गरज नाही.आमचा कार्यकर्ताही पुरेसा आहे. पण त्यांना डिबेट हवी असेल, तर मी तयार आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.



दरम्यान, राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येण्यासंबंधी प्रश्न विचारला. दोन्ही राष्ट्रवादीचा वर्धापनदिन सोहळा पार पडतोय. शरद पवार म्हणाले की, फूट पडली. पण त्याकडं लक्ष देऊ नका, जोमाने कामाला लागा. त्यांनी एकप्रकारे दोन्ही पवार एकत्र येतील या चर्चेला पूर्णविराम दिला का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'ते एकत्रित येणार की नाही? हे मी सांगू शकत नाही. त्यांच्या मनात शिरुन ते जाणून घेऊन तुमच्यापुढे ठेवण्याची माझ्याकडे शक्ती नाही अशी मिश्कील टिप्पणी त्यांनी केली.

शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आज पक्षाच्या वर्धापनदिन कार्यक्रमात बोलताना म्हणाले की, शरद पवारांनी मला सर्व जबाबदाऱ्यातून मुक्त करावं, त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जयंत पाटील यांच्या मनात मला शिरावं लागेल. सगळ्या जबाबदाऱ्यातून मुक्त करा म्हणाले, ते जबाबदारीतून मुक्त करणार हे माहित असल्यामुळे म्हणाले की, त्यांच्या मनात दुसरं काही आहे, हे समजून घ्यावं लागेल.

## आरसीबीवर १ वर्षाची बंदी घालण्याच्या हालचाली बीसीसीआय मोठा झटका देण्याच्या तयारीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

खझङ २०२५ मध्ये विराट कोहलीच्या रॉयल चॅलेंजर्स बेंगलोरने इतिहास रचलाय. तब्बल १८ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर आरसीबीला आयपीएलच्या ट्रॉफीवर नाव कोरण्यात यश आलंय. दरम्यान, आयपीएल जिंकल्यानंतर रॉयल चॅलेंजर्स बेंगलोरच्य आरसीबी संघासाठी एम. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर भव्य विजय मिरवणूक आणि सेलिब्रेशनचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, या विजय सोहळ्यादरम्यान मोठी गर्दी झाली आणि चेंगराचेंगरी झालेली पाहायला मिळाली. या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीररित्या जखमी झाले. या घटनेनंतर आरसीबी विरोधात एफआयआर नोंदवण्यात आली असून, कर्नाटक क्रिकेट असोसिएशनचे दोन अधिकारी राजीनामा देऊन बाहेर पडले आहेत. याप्रकरणात एका व्यक्तीला अटक देखील झाली आहे.

चेंगराचेंगरीत झालेल्या लोकांच्या मृत्यूनंतर आरसीबी संघ सध्या मोठ्या संकटात सापडला आहे. खझङ २०२६ मध्ये आरसीबी संघ सहभागी होणार की नाही, यावर आरसीबी मोठा निर्णय घेऊ शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

## आश्चर्यच...! पहिले 'आयएफएस' श्रेणी नंतर नावाची शिफारस

### तीन वर्षांत ४५ अधिकाऱ्यांना सेवाज्येष्ठता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

राज्य वनसेवेतील तब्बल ४५ वनाधिकाऱ्यांना आयएफएस श्रेणी देत सन २०१९ ते २०२२ पर्यंत सेवाज्येष्ठता मिळाली असून, यात काही अधिकाऱ्यांना तीन वर्षांपूर्वीच आयएफएस म्हणून नावांची शिफारस करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालयाचे अवर सचिव प्रदीपकुमार यांनी ३ जून २०२५ रोजी महाराष्ट्रातील तब्बल ४५ विभागीय वन अधिकाऱ्यांना राज्य कोट्यातून भारतीय वन सेवेत पदोन्नती दिली आहे. नियमावली १९६६ च्या ७ उपनियम-५ मध्ये समाविष्ट असलेल्या तरतुदीचा वापर करून केंद्रीय लोकसेवा आयोगाने शिफारशी करून राज्य सेवेतील वनाधिकाऱ्यांना पदोन्नती दिली आहे. गत तीन वर्षांपासून राज्य सेवेतील विभागीय वनाधिकाऱ्यांना आयएफएस अवॉर्ड देण्यात आलेला नाही. तब्बल पाच वेळा प्रस्ताव फेटाळण्यात आल्याची माहिती आहे. अखेर ४५ विभागीय वनाधिकारी आयएफएस झालेत, हे विशेष.

**अगोदर पदोन्नती नंतर सेवाज्येष्ठता**

तीन वर्षांनंतर केंद्रीय मंत्रालयाने वन विभागाच्या राज्य सेवेत कार्यरत ४५ विभागीय वनाधिकाऱ्यांना आयएफएस म्हणून स्वीकृती दिली असली, तरी यातील बरेच अधिकारी आयएफएस म्हणून काम करीत होते. अगोदर आयएफएस नंतर सेवाज्येष्ठता यादीमध्ये नाव, असा हा प्रकार आहे. २०२० च्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये सरोज गवस, प्रमोद पंचभाई, राहुल गवई हे अधिकारी प्रादेशिक वन विभागात कार्यरत आहेत. त्यांची नावे ३ जूनच्या यादीत समाविष्ट आहेत.

## सुनील खराटे यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १० अमरावती**

शहरातील सामाजिक कार्यकर्ता व स्थानिक राजकारणात सक्रीय असलेले सुनील ब. खराटे यांनी आज अधिकृतपणे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व कार्याध्यक्ष रविंद्र चव्हान यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. आपल्या निर्णयामागील भूमिका स्पष्ट करताना त्यांनी भारतीय जनता पक्षाचे स्थिर नेतृत्व, विकासाभिमुख धोरणे, आणि राष्ट्रीय विचारसरणीचा उल्लेख केला.



खराटे यांनी आपल्या स्पष्ट केले की,प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मा. अमित शाह यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची कार्यक्षमता हीच देशाच्या विकासाची खरी दिशा आहे. मला राष्ट्रहितासाठी व्यापक पातळीवर काम करण्याची इच्छा आहे, आणि ती संधी मला भारतीय जनता पक्षातच मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

**जनतेशी थेट संवादाचा संकल्प**

सरकार आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करणाऱ्या भाजप च्या धोरणामुळे मतदारांशी थेट संवाद साधता येतो, आणि लोकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर कार्यवाही करता येते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.मी भारतीय जनता पक्षात सामील होत असून, माझे कार्य हे निःस्वार्थ आणि समाजहितासाठीच राहील. अमरावती शहर, महाराष्ट्र राज्य, आणि देशासाठी मी सतत कार्यरत राहील असे सुनील खराटे यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय ......

# कधी थांबणार हे सगळे..!

दरवर्षी त्याच त्याच बातम्या त्या त्या सीझनमध्ये वाचायला मिळतात. उदाहरणार्थ, पाऊस पडला की, भुशी डॅममध्ये बुडून चार जणांचा मृत्यू. हे धरण लोणावळ्याच्या जवळ आहे आणि पावसाला सुरुवात झाली की, डॅम ओव्हरफ्लो होतो आणि पाणी वाहायला लागते. सोशल मीडियाच्या प्रभावामुळे आधीच उत्साह फार, त्यात हे असे अंगावर येणारे पर्यटन म्हणजे मग तर बघायलाच नको. धबधब्यासारख्या ठिकाणी सतत पाणी वाहून शेवाळ साचलेले असते आणि जागोजागी घसरण्याची भीती असते. पडला पाऊस की निघ फिरायला, हे धोरण ठेवून तरुण वर्ग आपआपल्या शहराच्या आसपासच्या धबधब्यावर जाऊन मजा करतात. अरे बाबांनो जरूर जा, मजा करा; पण काही सावधगिरी बाळगणार आहात की नाही?

वर्षांनुवर्षे तशाच प्रकारचे अपघात होऊ नयेत यासाठी त्यावर उपाययोजना का केली जात नसेल, हे आपल्यासारख्या सामान्य लोकांना समजत नाही. उदाहरणार्थ, भुशी धरणावर दरवर्षी अपघात होऊन अनेक लोक मरण पावतात. कालच असा काहीसा प्रसंग होऊन दोन युवक येथे बुडून मरण पावले. बुडणार्याला वाचवणारे पण समोर असतात. किमान चार-पाचशे लोकांचा जमाव असतो, तरीही लोक का पडतात, याची वेगळीच कारणे असतात. काल बुडालेले हे दोन तरुण धरणाच्या मागच्या बाजूला असलेल्या तलावाकडे गेले होते म्हणे. अनेक वर्षांपासून याच ठिकाणी अशाच प्रकारे अपघात होत असतील, तर हे थांबवायची जबाबदारी समाजाची आहे, शासनाची आहे, की नेमकी कोणाची आहे? याचा एकत्रित विचार व्हायला पाहिजे. अरे बाबांनो, धरणाच्या मागच्या बाजूला जाऊन जर लोक पडत असतील, तर धरणाच्या मागे जायचे रस्ते तरी बंद करा, म्हणजे लोक मरायचं कमी होतील.तशीच गोष्ट काल घडलेल्या अपघाताची. रेल्वेच्या दारामध्ये लोबंकळत पाच-सात जण उभे होते. अशा वेळेला कोणीतरी काहीतरी हुल्लडबाजी संधिवात ही एक अशी व्याधी आहे जी मुख्यत्वे शरीरातील सांध्यांवर परिणाम करते. हा आजार विशेषतः वयानुसार वाढतो, पण हल्लीच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे कमी वयातही लोक याच्या कचाट्यात सापडत आहेत. संधिवातामध्ये सांध्यांमध्ये सूज, वेदना, कडकपणा व हालचालींमध्ये अडथळा जाणवतो. हे त्रास सुरुवातीला किरकोळ वाटतात, पण वेळेत उपचार न केल्यास ते अधिक गंभीर होऊ शकतात.केली असेल, कोणाचा कोणाला धक्का लागला असेल किंवा कोणाचा पाय निसटला असेल, तो एक जण पडला, तो पाच जणांना घेऊन पडला. यामध्ये किमान चौघांना प्राण गमवावा लागला, तर अनेक जण जखमी झाले. अरे बाबांनो, हे माहिती असेल तर मग दारात बसून प्रवास कशाला करता? अशा प्रकारचे अपघात ज्या दिवशी थांबतील, तो भारताच्या दृष्टीने एक 'सुदिन' म्हणावा लागेल. रोजचे वर्तमानपत्र उघडले किंवा टीव्हीचे न्यूज चॅनल लावल्याबरोबर दुसरे काहीच दिसत नाही. इकडे इतके गेले, तिकडे अपघात, भीषण अपघात, साधा अपघात, विचित्र अपघात अशा प्रकारच्या बातम्या असतात. दुसरे काही होणार नसेल, तर मग आपल्याला पुन्हा एकदा विचार करायला पाहिजे की, आपण विकास म्हणजे काय करतो आहोत?

# आज वटपौर्णिमा:अंबानगरीत १०० वर्षांपेक्षा जास्त वय असलेले २१ वटवृक्ष

## ५० वर्षांपेक्षा जास्त वयाचे एकूण २२१ हेरिटेज वटवृक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती-** वटपौर्णिमेनिमित्त आज मंगळवार, १० जूनला शहरात सुवासिनी महिला वटवृक्षाचे पूजन करून सौभाग्याची कामना करणार आहेत. यानिमित्त पर्यावरण रक्षणासह शुद्ध हवेचा स्रोत असलेल्या या वटवृक्षांबाबत दिव्य मराठीने माहिती घेतली असता शहराच्या विविध भागांत ५० वर्षांपेक्षा जास्त वय असलेले २२१ हेरिटेज वटवृक्ष असून, त्यात २१ वटवृक्षांचे वय हे १०० वर्षांपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे.



मनपासह परिसरातील नागरिक या झाडांची निगा राखत असून त्यांची नियमितपणे पूजाही केली जात आहे.

१०० वर्षांपेक्षा जास्त वय असलेले दोन वटवृक्ष हे गडगडेश्वर मंदिर परिसरात आहेत. एक मंदिराच्या आत असून, दुसरा वटवृक्ष हा मंदिराच्या उजव्या बाजूला असलेल्या लहान हनुमान मंदिराजवळ आहे. तिसरा मोठा वटवृक्ष हा व्हीएमव्ही महाविद्यालयाजवळ, चौथा वटवृक्ष बडनेरा पुलाच्या बाजूला असलेल्या परिसरात आहे. तसेच झोन क्रमांक २ मध्ये बडनेरा रोडवर, पांढरीच्या हनुमान मंदिराजवळ, मोर्शी रोडवर स्वामी समर्थ मंदिराजवळ असे एकूण २१ वटवृक्ष हे १०० वर्षांपेक्षा जास्त वय असलेले आहेत. वडाच्या पारंब्या जमिनीत शिरून या झाडाला आधार देत असतात. २०१२ ते २०१४ या कालावधीत शहरात आलेल्या वादळात ११ वडाची विशाल झाडे ज्यांचे वय १०० वर्षांपेक्षा जास्त होते, ते कोसळले. हे शहराचे मोठे नुकसान असल्याचे वनराईचे मधू घारड यांनी सांगितले आहे.

वडाच्या झाडाला पवित्र, शुद्ध हवा देणारे समजले जाते. कारण, या वृक्षामध्ये मोठ्या प्रमाणात

### शहरात वडाचे २२१ हेरिटेज वृक्ष

संपूर्ण शहरात केलेल्या गणनेनुसार ५० वर्षांपेक्षा जास्त वय असलेले एकूण २२१ हेरिटेज वटवृक्ष आहेत. त्यांचे संरक्षण व्हावे, यासाठी मनपाद्वारे प्रयत्न सुरू आहेत. हे वटवृक्ष म्हणजे ऑक्सिजनची फॅक्टरी असून त्यांचे सर्वांनी रक्षण करावे. - **अमित डेंगरे**, वृक्ष मोजणी अधिकारी, मनपा.



ऑक्सिजनची निर्मिती करण्याची क्षमता असून त्यावर मोठ्या प्रमाणात जैवविविधताही नांदते. विविध पक्षी, कीटक, वेली या झाडाच्या आधाराने वाढत असतात. शहरात काही ठिकाणी वडाच्या वृक्षातूनच पिंपळ, औदुंबराचेही झाड निघाल्याचे दिसते. अशा वृक्षाला फारच पवित्र व त्रिमूर्ती ब्रह्मा, विष्णू, महेशाचे प्रतीक मानून त्याभोवती प्रदक्षिणा घातली जाते. वटवृक्षाबाबत नागरिकांच्या वेगवेगळ्या धारणा, आस्था असल्या तरी हा वृक्ष पर्यावरणाचे संतुलन राखण्यात महत्त्वाची भूमिका वठवतो. त्यामुळे त्याचे जतन, संवर्धन होणे ही सध्याची गरज आहे.




## संधिवात म्हणजे काय? जाणून घ्या लक्षणे आणि उपचारांची सविस्तर माहिती

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

संधिवाताचे मुख्यतः दोन प्रकार आहेत - एक म्हणजे ऑस्टियोआर्थरायटिस जो हाडांच्या घासामुळे होतो, आणि दुसरा रूमेटॉइड आर्थरायटिस, जो ऑटोइम्यून प्रकारात मोडतो. रूमेटॉइडमध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती स्वतःच्या सांध्यांवर हल्ला करते. यामध्ये सांध्यांमध्ये सतत वेदना, सूज आणि जळजळ असते. काही रुग्णांमध्ये सकाळी उठल्यावर सांधे कडक झाल्यासारखे वाटतात, आणि काही वेळानंतर हळूहळू हालचाल सुरळीत होते.


संधिवाताची कारणं अनेक असू शकतात. वय ही सर्वात सामान्य कारणं आहे. वयानुसार हाडांमधील द्रव कमी होतो आणि संधींचा कुशनिंग प्रभाव कमी होतो. याशिवाय लठ्ठपणा, आनुवंशिकता, अपघातामुळे झालेली दुखापत, हार्मोनल बदल, आणि संतुलित आहाराचा अभाव ही देखील महत्त्वाची कारणं आहेत. आधुनिक संशोधनानुसार, स्त्रियांमध्ये संधिवात होण्याचा धोका अधिक असतो, विशेषतः मेनोपॉजनंतर.

संधिवातावर उपचार वेगवेगळ्या प्रकारे केले जातात. डॉक्टरांकडून दिल्या जाणाऱ्या औषधांमध्ये वेदनाशामक, अँटी-इन्फ्लेमेटरी आणि स्टेरॉईड्स यांचा समावेश असतो. काही रुग्णांना फिजिओथेरपीचा सल्ला दिला जातो, ज्यामुळे सांध्यांची हालचाल सुधारते. गंभीर अवस्थांमध्ये सांध्यांचे रिप्लेसमेंट सर्जरी देखील केली जाते.

तज्ज्ञांच्या मते, संधिवात होऊ नये यासाठी आधीपासूनच काळजी घेणे आवश्यक आहे. शरीराचे वजन नियंत्रणात ठेवणे, दररोज व्यायाम करणे, कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी युक्त आहार घेणे, तणाव टाळणे आणि झोप पूर्ण घेणे या गोष्टींचे नियमित पालन केल्यास संधिवात टाळता येतो.

**संधिवाताची लक्षणे**

संधीस्थानी दुखणे: गुडघे, मांड्या,



मनगट, कोपरे, खांदे याठिकाणी सातत्याने वेदना जाणवणे.

संधीस्थानी सूज व जळजळ: जोडांभोवती सूज येणे व स्पर्श केल्यावर उष्णता जाणवणे.

सकाळी उठल्यावर जडसरपणा: सकाळी काही वेळ हालचाल करताना त्रास होतो.

चालण्यास किंवा पाय मोकळे करण्यास त्रास: विशेषतः जिने चढताना त्रास होतो.

संधींचा आवाज येणे: हालचाल करताना 'कट-कट' असा आवाज येणे.

हालचालींमध्ये अडथळा: अंग मोडणे, वाकणे किंवा हालचाल करताना अडथळा जाणवणे.

**संधिवाताची कारणे**

वय वाढणे: वयानुसार सांध्यांतील द्रव व कुशनिंग कमी होते.

आनुवंशिकता: कुटुंबामध्ये संधिवाताचे रुग्ण असल्यास धोका वाढतो.

जास्त वजन: लठ्ठपणामुळे सांध्यांवर अधिक ताण येतो.

आजारपण किंवा इन्फेक्शन: काही वायरल किंवा बॅक्टेरियल संसर्ग.

जखमा किंवा अपघात: पूर्वी झालेली सांध्यांची दुखापत.

ऑटोइम्यून डिसऑर्डर: जसे रूमेटॉईड आर्थरायटिस, ज्यात शरीर स्वतःच्या सांध्यांवर हल्ला करते.

संतुलित आहाराचा अभाव: कॅल्शियम, व्हिटॅमिन डी, आणि प्रोटीन कमी प्रमाणात घेतल्यास.

**वैद्यकीय उपचार**

पेनकिलर व अँटी-इन्फ्लेमेटरी गोळ्या: वेदना व सूज कमी करण्यासाठी.

स्टेरॉईड इंजेक्शन: तीव्र वेदनांमध्ये उपयोगी.

**फिजिओथेरपी:** हालचाल सुधारण्यासाठी.

सर्जरी: सांध्यांची रिप्लेसमेंट (उदा. गुडघ्याचे बदलणे) जर आवश्यक असेल तर.

**घरगुती उपाय**

**हळद दूध:** हळदीतील कुरक्युमिन सूज व वेदना कमी करते.

**मेथीचे दाणे:** संधिवात कमी करणारे नैसर्गिक घटक असतात.

**कोमट पाण्याने सेंक:** दुखणाऱ्या सांध्यांवर गरम पाण्याने सेंक द्या.

**योगासनं व स्ट्रेचिंग:** वज्रासन, ताडासन, अर्धमत्स्येंद्रासन उपयुक्त.

**कंट्रोल डाएट:** साखर, तळलेले व प्रक्रिया केलेले पदार्थ कमी करा.

ओमेगा-३ फॅटी ॲसिड: मासे, अक्रोड, फ्लॅक्ससीडमध्ये आढळतो - सूज कमी करतो.

**आयुर्वेदिक उपाय**

अश्वगंधा, शल्लकी, गुग्गुळ यांसारख्या औषधींचा उपयोग.

संधिवात टाळण्यासाठी टिप्स

संतुलित आहार घ्या, कॅल्शियम व व्हिटॅमिन-डी युक्त.

**जास्त वजन ठेवू नका.**

पुरेशी झोप व तणावमुक्त जीवनशैली ठेवा.

सांध्यांवर सतत ताण येणाऱ्या हालचाली टाळा.

# सोयाबीन पेरणीसाठी जुनी की नवी पद्धत फायदेशीर? जाणून घ्या सविस्तर


**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

मान्सून महाराष्ट्रात काही भागात पोहोचला आहे. शेतकरी बांधवांची खरीप हंगामाची लगबग सुरू झालेली आहे. परंतु मान्सूनपूर्वी अवकाळी अनपेक्षित पाऊस जास्त पडल्यामुळे शेतकरी बांधवांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

त्यामुळे शेतकरी बंधू-भगिनींनो सोयाबीन आणि तूर पिकांची पेरणी करताना गोंधळून न जाता या पिकांमध्येसुधारित पट्टापेर पेरणी पद्धतीने पेरणी करा, असे आवाहन बल्लारपूर तालुका कृषी अधिकारी श्रीधर चव्हाण यांनी केले आहे. याबाबत मार्गदर्शन किंवा मदत लागल्यास त्यांनी बल्लारपूर कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी चव्हाण यांनी केले आहे.सुधारित पट्टापेर पद्धती म्हणजे सोयाबीनच्या ५ किंवा ६ किंवा ७रांगांनंतर एक रांग रिकामी ठेवणे होय. या रिकाम्या ठेवलेल्या रांगेमुळे सोयाबीनमध्ये पट्टे तयार होतात आणि या पट्टधातून शेतकऱ्यांना फिरणे,

कृषी विशेष

फवारणी करणे सोयीचे होते. सोयाबीन पिकाला हवा व भरपूर सूर्यप्रकाश योग्य प्रकारे मिळू शकतो आणि विशेष म्हणजे वाढीसाठी अंतर मिळते. त्यामुळे सामान्य पद्धतीपेक्षा आपोआपच उत्पादन वाढीस मदत होते.



या सुधारित पेरणी पद्धतीचा शंभर टक्के लाभ घ्यायचा असल्यास सोयाबीन पेरल्यानंतर २५ ते ३० दिवसांत या रिकाम्या सोडलेल्या पट्टीमध्ये डवऱ्याला दोरी बांधून दांड पाडणे खूप महत्त्वाचे आहे. कारण या दांडामुळे पाऊस कमी झाल्यास पाणी मुरण्यास मदत होते व ओलावा टिकून राहतो. त्याचप्रमाणे पाऊस जास्त झाल्यास या दांडाद्वारे पाणी संथपणे वाहून जाण्यास मदत होते.

सोयाबीन पिकाची पेरणी सुधारित पट्टापेर पेरणी पद्धतीने करण्यासाठी कृषी विभागामार्फत जनजागृती सुरू आहे. शेतकऱ्यांचा प्रतिसाद पाहता यावर्षी मोठ्या प्रमाणावर पट्टापेर पेरणी पद्धतींनी पेरणी होणार आहे.

**- श्रीधर चव्हाण,** तालुका कृषी अधिकारी, बल्लारपूर.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

## साई भक्तांसाठी सुविधा; पुरी-साईनगर एक्स्प्रेस सुधारित संरचनेसह धावणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती -** राज्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र शिर्डी येथे जाण्यासाठी बडनेरा, अमरावतीच्या प्रवाशांसाठी एकमेव असलेली साप्ताहिक पुरी-साईनगर एक्स्प्रेस आता सुधारित संरचनेसह धावणार आहे. त्यामुळे प्रवाशांना किफायती दरात प्रवास करणे शक्य होणार आहे. साईनगर शिर्डीपर्यंत थेट घेऊन जाणारी ही एकमेव एक्स्प्रेस असल्यामुळे आरक्षण मिळणे अवघड असते. त्यामुळे सर्वसामान्यांना यातून प्रवास करणे शक्य होत नाही. आता आधीच्या चार ऐवजी सहा सामान्य श्रेणी कोच एक्स्प्रेसला देण्यात आले असून, एक तृतीय वातानुकुलित इकोनॉमी आणि पाच ऐवजी सहा शयनयान अशी या एक्स्प्रेसची नव्याने संरचना करण्यात आली आहे.अर्थात एक प्रथम वातानुकूलित, दोन द्वितीय वातानुकूलित, पाच तृतीय वातानुकूलित, एक तृतीय वातानुकूलित इकोनॉमी, सहा शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी (दोन पुढे व दोन मागे), एक पॅंट्री कार, दोन सामान्य द्वितीय श्रेणी सह गार्ड ब्रेक व्हॅनचा यात समावेश राहणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना या एक्स्प्रेसमधून शिर्डीकडे जाण्याची संधी आहे.

# मोफत दिल्या जाणाऱ्या सोयाबीन बियाण्याच्या बॅगेमध्ये ३ किलो बियाणे कमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अहिल्यानगर**

खरीप पेरणीसाठी कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना सोयाबीनचे मोफत बियाणे दिले जात आहे. एक हेक्टरच्या मर्यादेत ७५ किलो बियाणे प्रति लाभार्थी शेतकऱ्यांना मिळत आहे.

मात्र मोफत दिल्या जाणाऱ्या सोयाबीन बियाणांच्या प्रत्येक बॅगेमध्ये ३ किलो बियाणे कमी येत असल्याने शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

जिल्ह्यात कृषी विभागाला २ हजार २९३ क्विंटल सोयाबीन बियाणे वाटपाचे उद्दिष्ट आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांना पेरणीसाठी कमी खर्चात व काही बियाणे मोफत उपलब्ध व्हावेत, यासाठी कृषी विभागाकडून लाभार्थी शेतकऱ्यांची निवड केली जाते.

त्यात तूर, मूग, उडीद, ज्वारी या पिकांची बियाणे अनुदान तत्त्वावर दिले जातात. तर सोयाबीनचे बियाणे मोफत दिले जाते. महाबीजकडून बियाणांचा पुरवठा केला जात आहे.

सध्या मोफत असलेले सोयाबीन बियाणे घेण्यासाठी शेतकरी गर्दी करीत आहेत. महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरून निवड झालेल्या शेतकऱ्यांना सध्या सोयाबीन बियाणाचे वाटप होत आहे.

एक हेक्टरसाठी ७५ किलो बियाणे मिळणे अपेक्षित आहे. मात्र कंपनीकडून २२ किलो बियाणांची बॅग बनविली असून ३ बॅग दिल्या जात आहेत. त्यामुळे प्रति बॅग ३ किलोप्रमाणे ९ किलो बियाणे कमी मिळत असल्याची शेतकऱ्यांची ओरड आहे.

शासनाच्या या धोरणावर




शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. यावर कृषी विभागाने दोन-तीन शेतकऱ्यांनी एकत्र येऊन बियाणे घेण्याचे अवाहन केले आहे.

### बियाणांच्या बॅगवर क्यूआर कोड

महाबीजचे सर्व प्रमाणित बियाणे साथी पोर्टलमधून नोंदणी केलेले आहे. बियाणाच्या प्रत्येक बॅगवर साथी पोर्टलचा क्यूआर कोड आहे.

### ५० टक्के अनुदानावर मिळते बियाणे

तूर १४५ रुपये प्रति किलो, मूग १४० रुपये प्रति किलो, उडीद १३५ प्रति किलो दर असणार आहे. ५० टक्के अनुदानायर हे बियाणे मिळत आहेत. राष्ट्रीय खाद्य तेल अभियान अंतर्गत सोयाबीन पिकासाठी विविध वाणाचे बियाणे १०० टक्के अनुदानावर उपलब्ध होत आहे.

हा कोड स्कॅन केल्यानंतर बियाणांसाठी वापरलेले स्त्रोत, बियाणे कोठून मिळाले, उत्पादन व प्रक्रिया कुठे झाली आहे, तपासणी लॅब रिपोर्ट आर्दीची माहिती मिळणार आहे, असे महाबीजचे व्यवस्थापक सुनील फिरके यांनी सांगितले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १० जून २०२५ शहर/ग्रामिण

# आता शेतजमिनीचे वाद मिटणार, महसूल विभाग सुरु करतोय हा नवीन उपक्रम

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** शेतजमिनीशी संबंधित प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याकरीता माहे जुलैअखेर जिल्हानिहाय लोकअदालतीचे आयोजन करावे, त्याचबरोबर नागरिकांना शेतजमिनीची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करुन देण्याकरीता याबाबत इतर राज्याच्या प्रणालीचा अभ्यास करावा, असे निर्देश राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. पुणे जिल्ह्याने सुरू केलेल्या महसूल लोक अदालतीमुळे महसूली दाव्यांची संख्या मोठ्या प्रमाणात निकाली निघणार आहेत. त्यामुळे ही सर्वसामान्यांना न्याय देणारी महसूल लोकअदालतीची मोहीम यापुढे राज्यभरात राबविली जाईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केली.पुणे येथे झालेल्या महसूल परिषदेत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील ६ विभागीय आयुक्तांना महसूल विभागाच्या परिवर्तनाच्या दृष्टीने काही जबाबदाऱ्या दिल्या होत्या. त्यानुसार पुणे जिल्ह्याने हा उपक्रम हाती घेतला आहे.राज्यात मंत्रालय ते नायब तहसील पातळीवर मोठ्या प्रमाणावर म्हणजेच १३ लाखावर महसूली दावे प्रलंबित आहेत. ती प्रकरणे कशी संपतील यासाठी महसूल लोक अदालतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तसेच पक्षकार आणि वकीलांचे सहकार्य घेण्यात येईल.शेतजमिनीशी संबंधित प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याकरीता माहे जुलैअखेर जिल्हानिहाय लोकअदालतीचे आयोजन करावे, त्याचबरोबर नागरिकांना शेतजमिनीची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करुन देण्याकरीता याबाबत इतर राज्याच्या प्रणालीचा अभ्यास करावा, असे निर्देश राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.पुणे जिल्ह्याने सुरू केलेल्या महसूल लोक अदालतीमुळे महसूली दाव्यांची संख्या मोठ्या प्रमाणात निकाली निघणार आहेत. त्यामुळे ही सर्वसामान्यांना न्याय देणारी महसूल लोकअदालतीची मोहीम





यापुढे राज्यभरात राबविली जाईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केली.पुणे येथे झालेल्या महसूल परिषदेत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील ६ विभागीय आयुक्तांना महसूल विभागाच्या परिवर्तनाच्या दृष्टीने काही जबाबदाऱ्या दिल्या होत्या. त्यानुसार पुणे जिल्ह्याने हा उपक्रम हाती घेतला आहे.राज्यात मंत्रालय ते नायब तहसील पातळीवर मोठ्या प्रमाणावर म्हणजेच १३ लाखावर महसूली दावे प्रलंबित आहेत. ती प्रकरणे कशी संपतील यासाठी महसूल लोक अदालतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तसेच पक्षकार आणि वकीलांचे सहकार्य घेण्यात येईल.महसूल विभाग हा राज्याचा चेहरा आहे. वेळ आणि पैशाची बचत, मैत्रीपूर्ण न्यायव्यवस्था निर्माण करण्याकरिता, स्वखुशीने तडजोड निर्माण करण्याची व्यवस्था, महसूल व्यवस्थेवरील ताण कमी करणे आदी काम या महसूल लोक अदालतीच्या माध्यमातून झाले आहे.महसूल विभागात मोठ्या प्रमाणात पारदर्शकता आणण्यात येत आहे. विभागातील मागील २५ वर्षापासून प्रलंबित असलेले विषय शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुढे नेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पुणे जिल्ह्याने सादरीकरण केलेल्या बाबींच्या अनुषंगाने विविध शासन निर्णय काढण्यात येणार असून त्यामुळे राज्याच्या महसूलात २० हजार कोटींची वाढ होईल.ई-फेरफार प्रणालीच्या अनुषंगाने पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या परिपत्रकाचे राज्यभरात अभिनंदन झाले असून या परिपत्रकाप्रमाणे अंमलबजावणीसाठी शासन निर्णय करण्यात येईल, असेही ते म्हणाले.राज्य शासनाने नवीन वाळू धोरण आणले असून 'एम-सँड' म्हणजेच दगडापासून केलेली वाळू बांधकामात वापरली जाईल. त्यादृष्टीने शासकीय, खासगी जागा उपलब्ध करून देऊन क्रेशर उभारण्यात येतील.महाखनिजच्या माध्यमातून ऑनलाईन संनियंत्रण करून मागणीप्रमाणे वाळू उपलब्ध करून देण्यात येईल. जेणेकरून बुडणारा महसूल वाचण्यासह नदीच्या वाळूवरुन होणारे गैरप्रकार बंद होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना साठी ज्याप्रमाणे जिल्हा वार्षिक योजनेतून निधी दिला त्याप्रमाणे महसूल लोक अदालतीला द्यावा, महसूल विभागाला अत्याधुनिक मल्टीपर्पज वाहने मिळाल्यास विभागाच्या कामाला गती येईल, असेही ते म्हणाले.

# विभागीय लोकशाही दिनात १९ प्रकरणांवर सुनावणी ; पाच प्रकरणे निकाली

## प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करा – विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती,** विभागीय लोकशाही दिनासाठी प्राप्त अर्जांवर विहित कालमर्यादेत कार्यवाही करुन निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. विभागाला प्राप्त होणाऱ्या प्रकरणांच्याबाबत मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावा. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनी येवू नये, याची संबंधित विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त

डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित विभागांना आज येथे दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण १९ प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सुचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात श्रीमती सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. अपर आयुक्त रामदास सिध्दभट्टी, अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, राजू फडके, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून यावेळी बैठकीला उपस्थित होते.

यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण १९ प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून पाच प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना श्रीमती सिंघल यांनी संबंधित विभाग प्रमुखांना केल्या.

विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे सादर करण्यात आलेल्या ६ स्वीकृत व १३ अस्वीकृत अशा एकूण १९ अर्जांपैकी सविस्तर चर्चेअंती पाच प्रकरणे निकाली काढण्यात आलीत.

लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करुन अंतिम अहवाल तत्काळ सादर करण्यात यावा.

तक्रार अयोग्य असल्यास खारिज करुन संबंधितांना कळविण्यात यावे, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी संबंधितांना केल्या. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना श्रीमती सिंघल यांनी यावेळी केल्या.

# केंद्रीय लोकसेवा आयोग नागरी सेवा परीक्षा २०२६ च्या पूर्व प्रशिक्षणाकरीता प्रवेश परीक्षा

**सविस्तर माहिती www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध२७ जुलै रोजी प्रवेश परीक्षा**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२६ च्या विनामूल्य पूर्व प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रात प्रवेशासाठी प्रवेशपरीक्षा ऑफलाईन पद्धतीने राज्यस्तरावरून घेण्यात येणार आहे. या परीक्षेकरिता www.siac.org.in या संकेतस्थळावरील जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. परीक्षेसंबंधी महत्त्वाची माहिती पुढीलप्रमाणे आहे.प्रवेश परीक्षेकरीता ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज भरण्याचा कालावधी दि. ३ ते २७ जून २०२५ असून अर्ज भरण्याचा अंतिम तारीख २७ जून २०२५ पर्यंत आहे. परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दि. ३० जून २०२५ पर्यंत आहे. प्रवेश परीक्षा दि. २७ जुलै २०२५ (रविवार) ऑफलाईन पद्धतीने होणार असून परीक्षेची वेळ सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत राहील.सविस्तर जाहिरात, परीक्षेचा अभ्यासक्रम, ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतची माहिती व परीक्षेसंबंधी इतर सर्व सूचना www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावतीच्या संचालक डॉ. संगीता व्ही. पकडे (यावले) यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

# शिरसगाव बंड येथे अतिक्रमणाचा वाद चिघळला

## घरासमोरील अतिक्रमण काढल्यावरून दगडफेक

### तिघे जखमी; पोलिसांकडून गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०शि.बंड**

चांदूर बाजार तालुक्यातील शिरसगाव बंड येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकातील नीलेश रावळे यांच्या कुटुंबातर्फे अतिक्रमण केलेल्या जागेच्या वादावरून चौकात बसलेल्या नागरिकांवर दगडफेक करण्यात आली. यात ३ व्यक्ती जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आज, सोमवार, ९ जून रोजी सकाळी ८ वाजताच्या दरम्यान फिर्यादी राजेश देवीदास कडु ( वय ५०) घरी असताना गावातील लक्ष्मण महादेव दाभणे हे त्यांच्या घरी गेले. त्यांनी सांगितले की, लक्ष्मण दाभणे हे मंदिरात पुजा करण्यासाठी गेले असता रावळे कुटुंबीयांनी त्यांचे घरासमोरील अतिक्रमण काढल्यामुळे मनात राग धरुन शिवीगाळ करीत लक्ष्मण दाभणे यांना विटांचे तुकडे (बड़गर) फेकून मारले. त्यांना मारहाण व शिवीगाळही केली.

हे ऐकल्यानंतर राजेश कडू यांच्यासह गावातील सुनील रडके, शुभम निंभोरकर, अतुल बुटे, संतोष भेले, संतोष मेहरे, नितीन मेहरे, मनोज निंभोरकर, मनोहर निंभोरकर, मंगेश तांबटकर, बाबुराव रावणकर, अनिल मानापुरे, मुन्ना परदेशी, पवन भेले, राजेश कडु, बाळुभाऊ चर्जन, मंगेश भेले, विजय हेटकर, ओम गिरडकर, प्रितम मानापुरे आदी नागरिक रावळे कुटुंबियांना विचारपुस करण्यासाठी त्यांचे घरासमोरील रस्त्यावर गेले. परंतु




यावेळी निलेश रावळेसह कुटुंबातील ३ सदस्यांनी शिवीगाळ करत त्याठिकाणी असलेले विटांचे तुकडे (बडगर) या लोकांना फेकून मारले. यामध्ये राजेश कडू यांच्यासह सुनील कृष्णराव रडके व शुभम रवि निंभोरकर हे तिघे जखमी झाले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहे.

दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून परिस्थिती नियंत्रणात आणली. फिर्यादी राजेश कडू यांच्या तक्रारीवरून नीलेश रावळेसह तीन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# स्वागताला हार-बुके टाळण्याच्या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र यांनी सुरु केलेल्या 'स्वागताला हार-बुके ऐवजी शालेय साहित्य द्या', या अभियानाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून आज, सोमवारी जिल्हा परिषद कर्मचारी युनियनने १४ डझन शालेय साहित्य दिले. हे साहित्य आगामी शैक्षणिक सत्र सुरु होताना जिल्ह्यातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना वितरित केले जाणार आहे.सामान्य प्रशासन विभाग व पंचायत विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी १४



डझन ड्रॉइंग बुक्स, कलर बॉक्सेस, पेन्सिल्स, रबर, शार्पनर आणि स्केच पेन सीईओंच्या स्वाधीन केले. मिशन मेळघाट-२८ या उपक्रमासाठी सीईओंना नुकताच प्रतिष्ठित स्कॉच अवॉर्ड जाहीर झाला आहे. या उल्लेखनीय कार्याबद्दल सामान्य प्रशासन विभाग व पंचायत विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी १४ डझन शालेय साहित्य नेले होते. ते त्यांच्या स्वाधीन करण्यात आले. दरम्यान हा अभिनव उपक्रम शिक्षणविषयक उपयुक्ततेसह सामाजिकतेचा आदर्श असून जिल्हा परिषद प्रशासनाच्या विद्यार्थ्यांप्रती असलेल्या कळकळीची साक्ष देतो, अशा प्रतिक्रिया त्यामुळेच व्यक्त होत आहेत.उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांनी हा निर्णय घेतला. यामध्ये प्रशासन अधिकारी नीलेश तालन व पंकज गुल्हाने इतर कर्मचारी श्रीकांत मेश्राम, किशोर पन्नासे, रजनी मस्के, श्रीकांत सताफळे, सुजय ठाकरे, शिल्पा ठाकरे, मनिषा अंधारे, अविनाश गावंडे, नंदकिशोर गुडधे, परमेश्वर राठोड, सतीश पवार, विशाल विघे, जीवन नारे, समक्ष चांदुरे, संजय येऊतकर, दिनेश तांबडे, अमित बारबुध्दे, अमोल गाडेकर, विवेक कानेकर, पंकज गोरले, निशांत तायडे यांनी सहभाग नोंदवला.

# नागपूरमध्ये होतोय आता ई-चालान स्कॅम!

## नागरिकांची फसवणूक करणारे व्हॉट्सअ‍ॅप मेसेज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०नागपूर –** नागपूरमध्ये आता सायबर फसवणुकीचा नवा प्रकार समोर आला आहे. नागरिकांना फसवण्यासाठी व्हॉट्सअ‍ॅपवर बनावट ई-चलन मेसेज पाठवले जात आहेत. नागपूर सायबर पोलिसांनी याबाबत नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. हा मेसेज परिवहन सेवा किंवा वाहतूक पोलिसांच्या नावाने बनावट ई-चलन असल्याचे सांगतो. त्यात वाहन क्रमांक, उल्लंघनाची माहिती आणि पेमेंट लिंक असते. परंतु, या लिंकवर क्लिक केल्यास एक -PK (-ndroid Package Kit) फाइल डाउनलोड



होते, जी एक मालवेअर असते.हा मालवेअर वापरकर्त्यांच्या फोनमध्ये प्रवेश मिळवतो आणि संपर्क, संदेश, कॉल्स यासह इचड फंक्शनलिटीवर नियंत्रण मिळवतो. यामुळे बँकिंग अ‍ॅप्समध्ये प्रवेश मिळवून अनधिकृत व्यवहार होऊ शकतात. यापासून वाचण्यासाठी पोलीस प्रशासनाने नागरिकांना खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे.

**अधिकृत लिंक वापरा:** ई-चलन तपासण्यासाठी फक्त अधिकृत वेबसाइट (https://echallan.parivahan.gov.in) वापरा. व्हॉट्सअ‍ॅपद्वारे पाठवलेल्या -PK फाइल्स डाउनलोड करू नका.

# अमरावती आगाराला मिळणार केवळ ५ इलेक्ट्रिक एसटी बसेस

## पाठ पुरावा करण्यात विभाग नियंत्रक अपयशी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती**

अमरावती एसटी विभागाची इलेक्ट्रिक बसेसची प्रतीक्षा लवकरच संपणार आहे. येत्या एका आठवड्यात अमरावती डेपोला पुरवठादाराकडून ५ इलेक्ट्रिक एसटी बसेस मिळणार आहेत. आधी २० ते २५ एसटी बसेस मिळणार होत्या. परंतु, काही तांत्रिक अडचणी, मागणीत झालेली वाढ तसेच उत्पादन घटल्यामुळे पुरवठादार अमरावती डेपोला ५ बसेस देणार आहे.इलेक्ट्रिक एसटी बसेससाठी चार्जिंग स्टेशनची आवश्यकता असते. चार्जिंग स्टेशन तपोवन येथील एसटीच्या मध्यवर्ती कार्यशाळेत तयार झाले आहे. येथे एकाचवेळी १७ बसेस चार्ज करता येईल, अशी सोय आहे. त्यामुळे आता बसेसही मिळणार आहेत. बसेस आल्या की लगेच हे चार्जिंग स्टेशन सुरू केले जाईल. सध्या चार्जिंग स्टेशनवरील मुख्य विद्युत वाहिनीची जोडणी पूर्ण व्हायची आहे. येत्या काही दिवसांत ती पूर्ण होणार आहे. या कार्यशाळेत इलेक्ट्रिक एसटी बसेसचा रखरखाव, स्वच्छता व चार्जिंगची सोय आहे. एक बस चार्ज करण्यासाठी किमान ३ तासांचा कालावधी लागतो. एकदा चार्ज केल्यानंतर बस १५० ते १८० किमी. अंतर धावते. तसेच ती संपूर्ण एसी असल्यामुळे शिवशाही बसचे जेवढे तिकीट दर आहेत, तेवढेच इलेक्ट्रिक एसटी बससाठी लागणार आहेत. इलेक्ट्रिक एसटी बसमुळे वायू व ध्वनी प्रदूषण होत नाही. हेच या बसचे मुख्य वैशिष्ट्य आहे. अद्याप जिल्ह्यातील इतर डेपोंमध्ये चार्जिंग स्टेशन सुरू झाले नसल्याने अमरावतीत



आलेल्या इलेक्ट्रिक बसेस कोणत्या मार्गाने चालवायच्या याबाबत निर्णय घेण्यात आला नाही.जिल्यातील राजकीय मंडळी सुद्धा या बाबत अधिक पाठपुरावा करतांना दिसत नाही आहे हे विशेष. इलेक्ट्रिक एसटी बसेसमुळे प्रवासाचा वेग वाढणार असून, प्रवाशांनाही प्रवासाकरिता एक उत्तम पर्याय उपलब्ध होणार आहे. कारण, मागील एक ते दीड वर्षांपासून चार्जिंग स्टेशनचे घोडे अडले होते. आता चार्जिंग स्टेशन पूर्णपणे तयार झाल्यामुळे इलेक्ट्रिक एसटी बसेस अमरावती विभागातील रस्त्यांवर लवकरच धावताना दिसणार आहेत.

### बसेस मिळण्यात काही दिवस मागेपुढे होऊ शकतात

नागपूरला पहिल्या टप्प्यात २५ इलेक्ट्रिक एसटी बसेस मिळाल्या. त्यानुसार अमरावती एसटी विभागाद्वारे २० ते २५ बसेसची मागणी नोंदवण्यात आली होती. परंतु, पुरवठादार एकाचवेळी एवढ्या मोठ्या संख्येत बसेस देण्यास तयार नसल्याने एका आठवड्यात पहिल्या टप्प्यात ५ इलेक्ट्रिक एसटी बसेस मिळतील. काही दिवस मागेपुढेही होऊ शकतात.

नीलेश बेलसरे, विभागीय नियंत्रक, एसटी, अमरावती.

# शालेय जीवनात उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी 'सक्षम' कार्यक्रम ठरला प्रभावी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई,**

युवकांमधील उद्योजकतेला चालना देण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच अनुषंगाने शासनाच्या बरोबरीने सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून गत दोन वर्षांत नागपूर आणि अमरावती जिल्ह्यात शासकीय व अनुदानित शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये 'उद्यम लर्निंग फाउंडेशनच्या' माध्यमातून 'सक्षम' हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. यातून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये उद्यमशील मानसिकता विकास कार्यक्रम प्रभावी ठरल्याचे निष्पन्न झाले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून हा उपक्रम राबविण्यात आला होता. उद्यम लर्निंग फाउंडेशन ही मेकिन महेश्वरी यांनी ना-नफा तत्वावर स्थापन केलेली संस्था असून १४ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये प्रकल्पाधारित शिक्षणातून उद्यमशील मानसिकता व कौशल्ये विकसित करणे तसेच शिक्षकांना अध्यापनाच्या कौशल्यांमध्ये प्राविण्य मिळवून देणे ही या संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या 'सक्षम' कार्यक्रमाची उद्दिष्टे निश्चित केली होती. विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, आत्मविश्वास आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढवण्यास हा कार्यक्रम मदत करणार असून या माध्यमातून राज्यातील १७ हजार शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधून सुमारे ४५ लाख विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. संस्थेने आतापर्यंत १२ राज्यांतील सरकारी शाळा, महाविद्यालय, आयटीआय संस्थांमध्ये २९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना उद्योजकीय शिक्षण दिले आहे.नवोदित उद्योजकांना आपल्या व्यवसायाला आकार देऊन त्याची वाढ करण्यासाठी राज्यात



योग्य वातावरण आपण उपलब्ध करून दिले आहे. महाराष्ट्रात दरवर्षी सुमारे १४ लाख युवा मनुष्यबळ दाखल होत असल्याने त्यांच्या हातांना अधिक कौशल्यपूर्ण करण्यासाठी 'सक्षम' सारख्या कार्यक्रमाच्या माध्यमातून दिले जाणारे प्रोत्साहन अधिक उपयुक्त ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

राज्य शासनाच्या यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये समन्वय साधून 'सक्षम' सारखे कार्यक्रम अधिक व्यापक पातळीवर राबविल्यास शिक्षणाच्या माध्यमातून उद्योजकतेचा पाया रुजवण्याचे हे एक प्रभावी उदाहरण ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.२०२३-२४ मध्ये नागपूर जिल्ह्यातील निवडक शाळांमध्ये सक्षम उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाद्वारे शालेय जीवनातच विद्यार्थ्यांच्या मनावर अत्यंत प्रभावीपणे उद्यमशिलतेला चालना देणारे संस्कार घडविता आले. यातून उत्तम प्रकारे कौशल्य शिक्षणाचा एक यशस्वी प्रयत्न आम्हाला करता आला याचे समाधान आहे. यातून विद्यार्थ्यांनी नोकरी/ स्वयंरोजगार निर्मिती कशी होऊ शकते याची प्रत्यक्ष अनुभूती घेतली. विद्यार्थ्यांचा विश्वास यातून वाढला. हा उपक्रम भविष्यातही मोठे परिवर्तन साध्य करुन दाखविल, असे प्रतिपादन नागपूर जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांनी केले.'उद्यम' मार्फत राज्यात आतापर्यंत नागपूर जिल्हा परिषदेच्या ३० शाळांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्यात आला असून ४० प्रकल्पांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. अमरावती जिल्हा परिषदेच्या २१२ शाळांतील आठ हजार विद्यार्थ्यांसोबत कार्यक्रम राबविण्यात आला असून २०२५-२६ मध्ये ४०० शाळांमध्ये विस्तार करण्यात येणार आहे. राज्यात १५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या सक्षम कार्यक्रमामार्फत २५०० हून अधिक व्यवसाय कल्पना सादर करण्यात आल्या, १५०० प्रोटोटाइप तयार झाले, तर ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्पादनांची विक्री केली. एकूणच विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत सकारात्मक बदल दिसून आला असून, ५०० शिक्षकांना उद्योजकतेसंबंधी प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती उद्यम लर्निंग फाउंडेशनच्या वतीने देण्यात आली आहे.

# ऐन पेरणीच्या तोंडावर बाभुळगावातकापूस बियाण्याची ८०० पाकिटे जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०यवतमाळ**

जिल्ह्यात सर्वत्र खरीप लागवडीची तयारी सुरू असताना सातत्याने अप्रमाणित बियाणे पकडण्याच्या कारवाई कृषी विभागाकडून सुरू आहे. त्यामुळे अप्रमाणित बियाण्यांचा जिल्ह्यात सर्वत्र शिरकाव झाला असुन शेतकरी त्याला बळी पडत असल्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. असे असताना कृषी विभागाच्या पथकाने कळंब, बाभुळगाव आणि राळेगाव तालुक्यांमध्ये कारवाई करुन मोठ्या प्रमाणात अप्रमाणित बियाण्यांचा साठा जप्त केला.

**अनधिकृत कापूस बियाण्यांची ८०० पाकिटे जप्त** : यवतमाळ वाहनामधून वाहतुक करुन काही ठिकाणी उतरवण्यात आलेल्या अनधिकृत कापूस बियाण्यांच्या विविध तीन वाणांची तब्बल



४०० पाकिटे जप्त करण्यात आली. ही कारवाई बाभुळगाव पोलिसांनी कृषी विभागाच्या पथकासह केली. सोमवार दि. ९ जुन रोजी करण्यात आलेल्या या कारवाईमध्ये तीन आरोपींना अटक केली. दोन वाहनांसह १२ लाखांपेक्षा अधीकचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.बाभुळगाव येथील बस स्थानकाजवळ वाहन क्रमांक एमच २९ सीबी २६९० इको या वाहनाने भारत सरकार प्रतिबंधित केलेले अनधिकृत कापूस बियाणे यांची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिस विभाग व कृषी विभागाला मिळाली. त्याआधारे या दोन्ही विभागाच्या पथकांनी सापळा रचून वाहन चालकाला ताब्यात घेवून चौकशी केली असता त्या आधारे किशोर रामराव वाटमोडे रा. गवंडी यांच्या इलेक्ट्रिक न्ड रिवायडींग दुकानाच्या गोडावूनमध्ये ३ पोत्यांमध्ये भरुन असलेले १५० पॅकेट ताब्यात घेतले. त्यानंतर ज्ञानेश्वर किसन साखरकर रा. आसेगाव देवी यांचा राहत्या घरून ५ पोते

## अप्रमाणित बियाण्यांच्या शिरकावावर आता शिक्कामोर्तब

त्यामध्ये भरुन असलेले २५० पाकिटे जप्त करण्यात आले. अशा पद्धतीने या पथकाने उधम ५० पॅकेट, ग्लायफो गार्ड ५० पॅकेट व तिलक ३०० पॅकेट अशी नावे असलेली अनधिकृत कापूस बियाण्यांची एकुण ४०० पॅकेट जप्त करण्यात आले.

या बनावट बियाण्यांच्या ४०० पॅकेटची एकुण किंमत ५ लाख १६ हजार ७५० रुपये व २ चार चाकी वाहने अंदाजे ७ लाख रुपये किमतीची असा एकूण १२ लाख १६ हजार ७५० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी कृषी अधिकारी किशोर अंबरकर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी प्रविण वासुदेव साखरकर, रमेश सुखदेव लांजेवार, व किशोर रामराव वाटमोडे गुन्हा दाखल करण्यात आला.


# आयपीएस जालिंदर सुपेकर यांचे अमरावतीशी 'फ्रॉड' कनेक्शन

## मध्यवर्ती कारागृहात सात जणांचे केले होते निलंबन : खासगी सोहळ्यात उपस्थिती, मग कारागृहात भेट कशासाठी?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अमरावती**

पुणे येथील वैष्णवी हगवणे आत्महत्याप्रकरणी वादग्रस्त ठरलेले कारागृह व सुधार सेवा विभागाचे विशेष पोलिस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांची शासनाने मुंबईत होमगार्डच्या उपमहासमादेशकपदी बदली करून 'डिमोशन' केले आहे. मात्र, पत्नीच्या छळप्रकरणी अमरावती मध्यवर्ती कारागृहात बंदिस्त गायकवाड बाप-लेकांना मानसिक त्रास आणि 'डिमांड' पूर्ण न करणाऱ्या तुरुंगातील सात जणांचे सुपेकरांनी निलंबन केले होते. त्यामुळे सुपेकरांचे अमरावतीशी 'फ्रॉड' कनेक्शन नव्याने समोर आले आहे.

आयपीएस जालिंदर सुपेकर यांच्याकडे नागपूर येथील उपमहानिरीक्षकपदाचा अतिरिक्त कारभार असताना, त्यांनी १९ ऑगस्ट २०२३ रोजी अमरावती कारागृहात 'अनऑफिशियल' भेट दिली होती. कारागृहात बंदिस्त असलेल्या पुण्यातील हाय प्रोफाइल गायकवाड बाप-लेकांना तुरुंगाधिकाऱ्यांसमक्ष टार्गेट केले होते. ११०० पेक्षा जास्त कैदी असताना, सुपेकरांनी गायकवाड बाप-लेकांचीच भेट का घेतली, हा आता संशोधनाचा विषय ठरत आहे.



पत्नीच्या छळप्रकरणी पुणे येथील नानासाहेब गायकवाड आणि मुलगा गणेश गायकवाड हे येरवडा कारागृहात बंदिस्त होते. मात्र, या बाप-लेकांची अचानक पुण्याहून अमरावती मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. हा निर्णय कोणी, कशासाठी घेतला, याची विशेष चौकशी केल्यास मोठा 'फ्रॉड' बाहेर आल्याशिवाय राहणार नाही, असे बोलले जात आहे.

# पीआय टू पीएसआय यांच्या होणार अंतर्गत बदल्या

## दोन ते तीन ट्रम झालेल्यांना गुन्हेशाखेतून मिळणार सुट्टी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अमरावती-**

पोलीस आयुक्तालयातील पोलीस निरीक्षक ते पोलीस उपनिरीक्षकांच्या येणार्या काही दिवसात अंतर्गत बदल्या होणार आहे. तसेच गुन्हेशाखेत ज्या कर्मचार्यांनी याआधी दोन ते तीनवेळा काम केले आहे अशा कर्मचार्यांच्यासुध्दा बदल्या होणार आहे.

शहराचे पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांना २० दिवस पूर्ण झाले. या २०




दिवसाताच त्यांनी शहराचा पूर्ण आढावा घेतला असून शहरातील गुन्हेगारीबाबत माहिती घेतली. तसेच आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्याची माहिती घेतल्यानंतर अधिकार्यांच्या अंतर्गत बदली करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. त्यामुळे येणार्या काही दिवसात १० पोलीस ठाण्यातील अधिकार्यांच्या अंतर्गत बदल्या होणार आहे.



येणार्या काही दिवसात पीआय ते पीएसआय यांच्या अंतर्गत बदल्या होणार आहे. तसेच ज्या कर्मचार्यांनी याआधी गुन्हेशाखेत काम केले आहे त्यांच्या नावाची यादी तयार करायला सांगितली असून त्यांचीसुध्दा बदली करण्यात येणार.

**अरविंद चावरिया,** पोलीस आयुक्त.

तसेच ज्या पोलीस कर्मचार्यांनी याआधी गुन्हेशाखेत दोन ते तीनवेळा काम केले आहे त्यांची सुध्दा बदली होणार आहे. अशा कर्मवा यांच्या नावाची यादी तयार करण्याची प्रकिया सुरु आहे. त्यामुळे शहर गुन्हेशाखेत मोठा बदल होण्याची शक्यता आहे.

# अवैध पार्सल वाहतूक करणाऱ्या ट्रॅव्हल्सच्या तपासणीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अमरावती-**

युवक काँग्रेसचे पदाधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा ग्राहक परिषदेचे सदस्य जवंजाळ यांनी ट्रॅव्हल्सच्या प्रत्येक थांब्यावर संबंधित गाडीच्या तपासणीची मागणी केली आहे. अलीकडेच एका ट्रॅव्हल्समधून गुजरातेतून आलेले प्रतिबंधित बियाणे नागपूरला नेण्यात येत होते; परंतु कृषी विभागाच्या सतर्कतेमुळे ते अमरावतीच्या थांब्यावर पकडले गेले. याच जप्ती कारवाईच्या पार्श्वभूमीवर ही मागणी पुढे आली आहे. त्यांच्यामते संबंधित विभाग व पोलिस कारवाई करतातच. परंतु आरटीओच्या अधिकार्यांनी ही बाब नियमितपणे केली पाहिजे. त्याशिवाय नागरिक, शासनाची फसवणूक थांबणार नाही. शहरातील वेलकम पॉइंट येथे नुकत्याच झालेल्या एका कारवाईदरम्यान गुजरातमधील अहमदाबाद येथून नागपूरकडे जाणार्या एका खासगी प्रवासी



बसमधून प्रतिबंधित व अनधिकृत एचटीबीटी कापूस असलेल्या या बियाणांची किंमत सुमारे २५ लाख रुपये आहे. ही कारवाई जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या पथकाने केली होती.हे बियाणे प्रवासी बसमध्ये अवैधरित्या पार्सल स्वरूपात लोड करून वाहून नेले जात होते. इतक्या अवैध वस्तूंची वाहतूक एका प्रवासी वाहनामार्फत होत असताना परिवहन विभागाचे दुर्लक्ष होणे हे गंभीर आहे.या प्रकारांमुळे प्रवासी नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होतो. प्रवासी सेवा आणि नियमांचेही उल्लंघन होत आहे. अशा अवैध पार्सल वाहतुकीमुळे प्रवाशांच्या सामानात अडथळा निर्माण होतो, अपघाताच्या किंवा आग लागण्या च्या घटनांचीही शक्यता वाढते, इतर प्रवाशांच्या जीविता स धोका पोहोचतो आणि कायदेसंघर्ष व अप प्रवृत्तीलाही चालना मिळते. त्यामुळे आरटीओच्या पथकाने या वाहनांची प्रत्येक थांब्यावर तपासणी केल्यास या सर्व बाबींना पायबंद घातला जाईल असे जवंजाळ यांचे म्हणणे आहे.

### अशी करावी उपाययोजना

अशा घटनांवर अंकुश लावण्यासाठी वेलकम पॉइंटसह इतर प्रमुख स्थानकावर आरटीओ विभागामार्फत नियमित तपासणी मोहीम राबवावी. प्रवासी वाहतूक करणार्या बसमधून अवैध पार्सल वाहतूक करणार्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी. अशा वाहतूक कंपन्यांचे परवाने तपासून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी. संबंधित वाहन चालक व मालकांवर परिवहन कायद्यानुसार गुन्हे नोंदवावे.

# भाजपा भातकुली शहरच्या वतीने वृक्षारोपण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० भातकुली :**

संपूर्ण महाराष्ट्रात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशान्वये संपूर्ण दोन महिने समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याकरिता भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या नेतृत्वात भातकुली शहरामध्ये पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले.

ज्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला संदेश एक पेड मा के नाम' याला सार्थ ठरविण्यासाठी भारतीय जनता पक्षाने भातकुठी परिसरामध्ये ग्रामीण रुग्णालय,



पोलिसस्टेशन, कोदडेश्वर मंदिर, छोगालाल राठी गुरुकुल विद्यालय, न.प. हद्दीत जांभूळ, निंब, आंबा, सिताफळ अशा विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. यानंतर सतत दोन महिने प्रत्येक भारतीय जनता पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्याच्या नावाने एक पेड मा के नाम या संकल्पनेने भातकुली शहरात वृक्षारोपण करण्याचा मानस भाजपा शहराध्यक्ष सतीश आठवले यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाला भाजपा जिल्हा किसान मोर्चा अध्यक्ष मिलिंद बाबल, भाजपा भातकुली शहर मंडळ अध्यक्ष सतीश आठवले, बाळासाहेब भजभुजे, दिनेश खेडकर, अमोल रेहपाडे,म. सादिक, अक्षय जानवाडे, नंदू काळे, राजू ढोके, अंकुश पाचडे, राहुल बोरा, निवृत्ती चतुर्भुज, शिवा जाधव, शैलेश खाडेकर, उज्वल अंबाडे, विनोद बांभुळकर, ॲड. पंकज यादगिरे, संजय बांबल, विशाल मानकर, सागर ठाकरे, हरीश हजारे, संतोष कयमखेडे, संजय भोमे, शरद कोलटेके, श्याम मानकर, विशाल राऊत, संदीप कळमखेडे, विनोद बाभुळकर तसेच भातकुली शहर व बहनेरा ग्रामीणमधील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# संत मुक्ताई यांच्या पालखीचे मोताळ्यातून पंढरपूरकडे प्रस्थान

## शेकडो वारकऱ्यांसह भाविक झाले सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मोताळा-** संत मुक्ताबाईच्या आषाढी वारी पालखीला ६ जून रोजी सुरुवात झाली असून ८ जून रोजी पालखी मोताळा येथे मुक्कामी आली होती.

दरम्यान, आज ९ जून रोजी सकाळी पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान केले. यावेळी शहरात ठिकठिकाणी पालखीचे भाविकांकडून स्वागत करण्यात आले आहे.

संत मुक्ताबाई पालखीला ६ जून रोजी मुक्ताईनगर येथून सुरुवात झाली असून ३ जुलै रोजी पालखी पंढरपूर येथे दाखल होणार आहे. ८ जून रोजी संध्याकाळी पालखीचे



मोताळ्यात आगमन झाले. यावेळी पालखी मार्गावर भाविकांच्या वतीने रांगोळ्या काढून स्वागत करण्यात आले. प्रा. मामलकर आणी ज्ञानेश्वर वाघ यांच्या हस्ते मुक्ताईची आरती करण्यात आली. पालखीमध्ये हजारो भाविक सहभागी झाले होते. तसेच शंभरावर दिंड्या आणि रथ ओढणारी खिल्लारी बैलाची जोडी हे भाविकांचे आकर्षण ठरत होते. पालखीचे प्रमुख रवींद्र हरणे महाराज होते. श्री क्षेत्र पंढरपुरात या पालखीला प्रथम प्रवेशाचा मान आहे. या पालखीने आज बुलडाण्याकडे प्रस्थान केले आहे. संध्याकाळी बुलडाणा येथे पोहोचून रात्री मुक्कामी राहणार आहे. १० जून रोजी पालखी पंढरपूरसाठी प्रस्थान करणार आहे. यावेळी बोराखेडी ठाणेदार सारंग नवलकार यांच्या मार्गदर्शनात बोराखेडी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# चांदूरबाजारमध्ये सरकार विरोधात मुंडण आंदोलन

## बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाची धग शेतकरी आणि दिव्यांग बांधवांचा एल्गार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १० चांदूरबाजार**

राज्यातील शेतकरी व दिव्यांग बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी जनतेचा खंदा लढवय्या नेता, माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी कालपासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधीस्थळ, मोझरी येथे बेमुदत अन्नत्याग उपोषणाला प्रारंभ केला आहे.दोन दिवस उलटूनही सरकारने कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्याने राज्य सरकारचा निषेध करण्यासाठी आज मंगळवारी सकाळी ११:०० वाजता शेकडो शेतकरी व दिव्यांग बांधव चांदुर बाजार तहसील कार्यालयावर मुंडन आंदोलन करणार आहेत. राज्यातील लाखो शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, शेतमजुरांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ, मनरेगाच्या मजुरीत वाढ, शेतमजुरांना विमा संरक्षण, सेंद्रिय खतांना अनुदान, तसेच दूध उत्पादकांना योग्य दर या प्रमुख मागण्यांसाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधीजवळ दोन दिवसांपासून बेमुदत अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी सरकारने शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफी आणि सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, निवडणुका संपून सत्तास्थापनेला अनेक महिने उलटले तरीही शेतकऱ्यांच्या समस्या जशाच्या तशाच आहेत. त्यामुळे शासनाच्या 'झोपेच्या सोंग' विरोधात हा निषेध राहणार असून या आंदोलनामुळे प्रशासनाची झोप उडाली आहे. शेतकरी, शेतमजूर व दिव्यांगांच्या न्याय्य मागण्यांकडे सरकारने गांभीर्याने पाहावे, हीच आमची मागणी आहे. हा लढा केवळ काहीजणांचा नाही, तर सर्वसामान्यांच्या हक्काचा आहे, असे सांगत शेतकरी,शेतमजूर अंगात आहेत.

# दादासाहेब गवई स्मारक उभारण्यासाठी गती द्यावी-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अमूल्य योगदान येणारे रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे स्मारक ही जनतेसाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या कार्याला समर्पित अशा स्मारकाच्या कामाला विविध यंत्रणांनी गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात आज रा. सू. गवई स्मारकाबाबत विविध यंत्रणांची आढावा बैठक घेतली. यावेळी कमलताई गवई यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.श्री. येरेकर म्हणाले, दादासाहेबांचे स्मारक प्रामुख्याने तीन भागात



विभागाले आहे. यात दादासाहेबांचा पुतळा, चित्रप्रदर्शनी आणि श्रोतृगृह असणार आहे. पुतळा उभारण्यासाठी जे. जे. स्कूलशी पाठपुरावा करून पुतळ्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रक्रिया जलद गतीने करण्यात याव्यात. यात आवश्यक असलेला कालावधी कमी करणे शक्य असल्यास तपासून पहावे. यासोबतच गरजेनुसार असलेल्या परवानगी आणि ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.चित्र प्रदर्शनीमध्ये लावण्यात येणाऱ्या छायाचित्रांची संख्या आणि त्यानुसार छायाचित्रांची निवड करण्यात यावी. याठिकाणी येणाऱ्या नागरिकाला सुस्पष्ट दिसतील, अशा पद्धतीने छायाचित्रे लावण्यात यावी. तसेच याठिकाणी दादासाहेबांचा जीवनपट दाखवणारी भिंत तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी आवश्यक प्रसंगांची निवड समितीच्या मान्यतेने घ्यावी. किऑस्क, व्हीडीओ, दादासाहेबांचे कृत्रिम बुद्धीमत्तेने केलेली भाषणे याबाबत कार्य करताना समितीचा सल्ला घ्यावा.स्मारकामध्ये श्रोतृगृह बांधण्यात येणार आहे. सदर श्रोतृगृह विद्यापीठाला हस्तांतरीत करण्यात येणार आहे. यासाठी विद्यापीठाने अनुषंगीक कार्यवाही करावी. प्रामुख्याने वीज जोडणी, कर यासारख्या बाबींवर प्रक्रिया सुरू करावी. न्यास नोंदणी झाल्यानंतर विद्यापीठाशी हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येणार आहे. स्मारकासाठी न्यास नोंदणी करण्याचे शासन निर्णयात नमूद आहे. त्यानुसार तातडीने कार्यवाही करण्यात यावी. स्मारक पूर्णत्वास जाण्यासाठी प्रत्येक आठवड्यात याबाबत बैठक घेतली जाणार आहे. त्यामुळे स्मारकाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रत्येक यंत्रणेने वेळापत्रक तयार करावे, यातून अप्रतिम स्मारक उभे राहावे, यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

# युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

राज्यस्तरीय, विभागीय आणि जिल्हास्तरीय पातळीवर विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या युवा पिढीला प्रोत्साहन देण्यासाठी 'जिल्हा युवा पुरस्कार' २०२४-२५ अंतर्गत अर्ज मागवण्यात येत आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. एक युवक, एक युक्ती तसेच एक नोंदणीकृत संस्था यांना १० हजार रुपये रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. अर्जदाराचे वय १ एप्रिल रोजी १५ वर्षे पूर्ण व ३१ मार्च रोजी २९ वर्षांपर्यंत असावे. इच्छुक व पात्र युवक-युवती तसेच संस्थांना करावयाचे नमुना अर्ज अर्जदारांनी १६ जून २०२५ पूर्वी कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती, जिल्हा क्रीडा संकुल, मार्डी रोड, तपोवन गेट जवळ, अमरावती येथे सादर करावेत.

# आदिवासी शेतकऱ्यांना शेतीपासून वंचित करू नये; मेळघाटमधील शेतकऱ्यांची मागणी : आदिवासी धडकले जिल्हाधिकारी कार्यालयात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

मेळघाटमधील आदिवासी शेतक-यांना शेतीपासून वंचित करू नये, या एकमेव मागणीसाठी मेळघाटमधील आदिवासी शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयात धडकले होते.



मेळघाटमधील धरमडोह या गावातील आदिवासी शेतकऱ्यांकडे उदरनिर्वाहाचे कुठलेही साधन नाही. मागील अनेक वर्षापासून त्यांनी शासकीय पडीत जमीन कसून ती वाहितीस घेतली. ती जमीन वनविभागाची आहे की महसूल विभागाची, यावर काहीवर्ष वाद सुरू होता. नंतर मात्र वन विभागाने सदर जमिनीला कुंपण घालून शेतकऱ्यांना जमीन पेरणी करू नये, असे पत्र दिले. त्यामुळे धर्म या गावातील नागरिकांना भूमिहीन होण्याची भीती वाटतआहे.उदरनिर्वाहाचे कुठलेच साधन नसल्याने त्यांचे कुटुंब या शेतीवरत्त अवलंबून आहे. ही शेती जर हातची निघून गेली. तर आत्महत्या करण्याशिवाय कुठलाही पर्याय या शेतकऱ्यांकडे शिल्लक राहणार नाही. प्रत्येक शेतकऱ्याकडे पाच एकर शेती आहे. ती शेती मागील ४० वर्षापासून त्यांचे कुटुंब कसून उदरनिर्वाह चालवत आहे.त्यामुळे त्यांना शेतीपासून वंचित करू नये, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्यानिवेदनात केली आहे.निवेदन देतेवेळी नागो बेठेकर, शित्या बेठेकर, ओमप्रकाश आखंडे, सुंदरलाल आखंडे, गिता धिकार, नामज अखंडे, माधुरी बेठेकर, दिनेश बेठेकर, छोटेलाल बेठेकर, बबलू कास्देकर, सतीश धिकार, छबुलाल धिकार, मुन्नी धिकार, सुनीता धिकार, बाबूलाल कास्टेकर, भाऊलाल सावलकर, रवींद्र जामुनकर, प्रकाश जामुनकर, रवी जामुनकर, सुनील धोत्रे, प्रेमलाल धोत्रे, अंकित धिकार यांच्यासह आदिवासी बांधव उपस्थित होते.

सहायक वनसंरक्षक वनविभाग परतवाडा यांची २८ मे २०२५ ची नोटीस तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी अंजनगाव यांचे पत्र व १ वर्षापूर्वी जिल्हाधिकारी आणि सहायक उपवनसंरक्षक मेळघाट यांनी दिलेले आश्वासन यांचा विचार करून शेतकऱ्यांना शेतीपासून वंचित करूनये, अशी मागणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे.आहे.

# अवैध ढाब्यावर मिळते विदेशी दारू : हमीपत्र लिहून दिल्यावरही अवैद्य दारूविक्री होती सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०पथ्रोट**

साधारणतः तीन महिन्यांअगोदर ग्रामपंचायतची एनओसी नसतानाही रहिवाशी ले-आउटच्या अॅम्युनिटी केंद्रावर सुरू करण्यात आलेल्या नियमबाह्य ढाब्यावर दारूविक्री होत असल्याबाबतची तक्रार दाखल झाली होती. त्या अनुषंगाने ८ जूनच्या रात्री ८ वाजताच्या दरम्यान पथ्रोट पोलिसांनी धाड टाकत इंग्लिश दारू पकडली. सदर ढाब्यावर दारूविक्रीचा व्यवसाय करणार नाही, असे लेखी हमीपत्र लिहून दिल्यानंतरही दारूविक्रीचा प्रकार सुरूच होता, हे विशेष.पोलिसांची पथ्रोट टाउनमध्ये पेट्रोलिंग ड्युटी सुरू



असताना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या विश्वसनीय माहितीनुसार सदरचा नियमबाह्य ढाबा या ठिकाणी एक इसम अवैधरीत्या विनापरवाना इंग्लिश दारू विक्री करिता जवळ बाळगून आहे , अशी माहिती मिळालीत्यानुसार घटनास्थळ पोलिसांनी जप्ती पंचनाम्यातील पंचासमक्ष नियमबाह्य भाऊचा ढाबा येथील काउंटरची पंचासमक्ष पाहणी केली असता एका नायलॉन पिशवीमध्ये १८० एमएलच्या १० एमडी व्हिस्की इंग्लिश दारू जिची अंदाजे किंमत २ हजार रुपये आहे.असा माल मिळून आला. त्यावरून दारूविक्री करणारा स्वप्निल बाळकृष्ण मोकलकर (३२) रा. शहापूर अंजनगाव सुर्जी या संशयित आरोपीवर कलम ६५ म. दा. का. प्रमाणे कारवाई करण्यात आली.अशाच प्रकारची कारवाई शेतकरी ढाब्यावरसुद्धा करण्यात आली. त्या ठिकाणावरूनही १८० एमएल च्या ६ नग रॉयल स्टॅग इंग्लिश दारू जिची अंदाजे किंमत १२०० रुपये आहे. सदरचा माल जप्त करून निखिल प्रकाशराव काळे (३३) - रा. गोरलेपुरा पथ्रोट याच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात आली.

यासह चंदू भाऊराव दांडगे रा. इंदिरानगर पथ्रोट हा त्याचे राहते घरासमोर अवैधरीत्या देशीदारू विक्री करिता जवळ बाळगून आहे. अशा माहितीवरून धाड टाकली असता ९० एमएलच्या १२ नग देशीदारू पावट्या अंदाजे किंमत ६०० रुपयांचा माल मिळून आला.सदर नियमानुसार प्रकरणात कारवाई करण्यात आली. सदरची - कारवाई पोलिस हेस्ट कॉन्स्टेबल प्रवीण आगरकर, - सैनिक साहेबराव गभने, भूषण उमक, अंकुश राऊत, महिला सैनिक गायत्री वंजारी व अश्विनी मस्करे यांनी केली.

# ना हिरवा, ना भगवा; पहिले शेतकरी जगवा - सत्यपाल महाराज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०गुरुकुंज मोझरी**

जाती-धर्माच्या राजकारणात न अडकता तसेच हिरवा, भगव्या रंगाच्या भानगडीत न राहता या जगाचा पोशिंदा शेतकरी पहिले जगवा, याच्याच मनगटात एका दाण्याचे हजार दाणे निर्माण करण्याची ताकद आहे. या बळीराजाच्या हक्कासाठी आपण सर्व या अन्नत्याग आंदोलनाच्या खंबीरपणे पाठिशी उभे राहा, असे आवाहन समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराज यांनीगुरुकुंज मोझरी येथे केले.८ जूनपासून प्रहारचे संस्थापक माजी मंत्री बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन राष्ट्रसंतांच्या

**अन्नत्याग आंदोलनात सप्तखंजेरी प्रहार**



पुण्यभूमी गुरुकुंज आश्रम येथे सुरु आहे. या अन्नत्याग आंदोलनाला सत्यपाल महाराज यांनी भेट देवून कीर्तनाच्या माध्यमातून बळीराजा महती मांडली. सत्यपाल महाराजांनी आपल्या सत्यवाणीतून अन्यायाविरुध्द सप्तखंजेरीचा प्रहार केला. यावेळी लक्ष्मणदास काळे महाराज, रवीदादा मानव, संदीपपाल महाराज गिते, रामपाल महाराज धारकर, पंकजपाल राठोड, वेदांतपाल मुंदाने, विनोद मथुरकर यांच्यासह प्रहार पदाधिकारी, कार्यकर्ता व अमरावतीसह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातून शेतकरी बांधवांची उपस्थिती होती.

# महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना : आज तिसरा व अंतिम लकी ड्रॉ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती :**

महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा तिसरा व अंतिम लकी ड्रॉ ऑनलाईन पध्दतीने आज १० जून २०२५ रोजी काढण्यात येणार आहे. यातून प्रत्येक उपविभाग स्तरावर एक प्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ६५१ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन बक्षीस म्हणून दिला जाणार आहे, तर प्रत्येक उपविभागात प्रत्येकी दोन प्रमाणे दुसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन व प्रत्येकी दोन प्रमाणे तिसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट वॉच बक्षीस म्हणून दिले जाणार आहे. ७ एप्रिल व ७ मे रोजीच्या पहिल्या व दुसऱ्या लकी ड्रॉ मधील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले आहे. महावितरणने ऑनलाईन वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटलग्राहक योजना सुरू केली आहे. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीनपेक्षा अधिक वीजबिले ऑनलाईन पध्दतीने भरणाऱ्या सर्व लघुदाब वीज ग्राहकांना या योजनेचा फायदा होणार आहे.ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (एलटी-लाईव्ह) वीजग्राहकांसाठी लागू असून, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा ऑनलाईन पध्दतीने भरणा केलेला नाही. अधिक माहितीसाठी महावितरणच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीजबिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत.

# वेळापत्रकाविना शिक्षक बदली पोर्टल सुरू : रिक्त जागांची घोषणाही नाही; शिक्षकांत संभ्रमावस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षकांच्या बदलीचे वेळापत्रक जाहीर केलेले नाही. जिल्हा परिषदेतर्फे कोणत्याही सूचना नाहीत. बदलीसाठी रिक्त जागांची घोषणाही केलेली नाही अन् थेट बदली पोर्टल सुरू केले आहे.संवर्ग एक व दोनमध्ये असणाऱ्या शिक्षकांनी बदलीतून सूट हवी आहे का, याबाबतचे होकार व नकार भरण्याच्या सूचना बदली पोर्टलवर शनिवारी सायंकाळी जाहीर केल्या आहेत. रविवारअखेर ही मुदत देण्यात आली आहे. प्रशासनाचे स्पष्ट आदेश व बदली वेळापत्रक अधिकृत जाहीर न झाल्याने शिक्षक वर्ग कमालीचा गोंधळला आहे. शनिवार व रविवार हे दोन्ही दिवस शासकीय सुटीचे आहेत. त्यामुळे विचारणा कोणाला करावयाची, हा प्रश्न सर्वांना पडला आहे.पुन्हा आज एक दिवस मुदत वाढ दिली आहे.संवर्ग एक व दोन चे फार्म भरतांना ओटीपी व ई-मेलवर पिंट न येणे हया अडचणी आल्यात त्या दुर होणे आवश्यक आहे.जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांसाठी शासनाने शिक्षकांचे चार संवर्ग तयार केले आहेत. या चार संवर्गांनुसार व बदलीच्या सात टप्प्यांचे २८ एप्रिल ते ३१ मे पर्यंतचे वेळापत्रक यापूर्वी जाहीर केले होते. मात्र, आंतरजिल्हा आपसी बदली झालेल्या काही शिक्षकांनीऑनलाइन बदलीसाठी सेवाज्येष्ठता धरावी, यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याशिवाय १५ मार्च २०२४ च्या नवीन संचमान्यता आदेशाविरोधात अनेक जिल्ह्यांतील शिक्षकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या. १६ जूनपर्यंत संचमान्यतेबाबत जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या सर्व कारणांमुळे वेळापत्रकानुसार ३१ मे पूर्वी होणारी बदली प्रक्रिया जून सुरू झाला तरी प्रत्यक्षात सुरू झाली नाही.ऑनलाइन बदली प्रक्रियेनुसार बदलीपात्र, बदली अधिकारपात्र व सेवाज्येष्ठ शिक्षकांची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यानंतर समानीकरणासाठी रिक्त पदे ठेवून बदलीसाठी निव्वळ रिक्त जागा घोषित कराव्या लागतात. ही यादी घोषित करण्यापूर्वीच संवर्ग एक व दोनमधील शिक्षकांना बदलीसाठी होकार व नकार देणे बदली पोर्टलवर अचानक घोषित केल्याने शिक्षक वर्ग पुरता गोंधळला आहे. संवर्ग एक व दोनमधील बदलीइच्छुक शिक्षकांची यादी जाहीर करण्यासाठी व यादीतील शिक्षकांवर काही आक्षेप असतील तर ती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी हे अर्ज भरून घेतले जात असावेत, असे शिक्षक शैलेन्द्र दहातोंडे यांनी सांगितले.

# बच्चू कडू यांच्या समर्थनार्थ विश्रोळी येथील जलाशयात जलसमाधी आंदोलन

## अन्नत्याग आंदोलनाचा आजचा तिसरा दिवस



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०चांदुर बाजार**

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाले असून प्रहारच्या कार्यकर्त्यांनी पूर्णा मध्यम प्रकल्पाच्या विश्रोळी येथील जलाशयात जलसमाधी आंदोलन सुरू केले आहे, त्यामुळे पोलीस यंत्रणेवरील ताण वाढला आहे.

बच्चू कडू यांनी गुरूकूंज मोझरी येथे गेल्या तीन दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनार्थ कार्यकर्त्यांनी जलाशयात उड्या घेतल्या, असे प्रहारच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. प्रहारचे पंधरा ते वीस कार्यकर्ते पूर्णा धरणाच्या जलाशयात घोषणा देत उभे आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, शेतमजुरांच्या उत्कर्षाकरिता स्वतंत्र आर्थिक महामंडळ, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या मजुरीत वाढ, शेतकऱ्यांप्रमाणे शेतमजुरांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याला विमा संरक्षण मिळावे, शेतमजुरांचे आर्थिक हित जपण्याकरिता स्वतंत्र मंडळाची उभारणी व्हावी, लागवड ते कापणीपर्यंतच्या सर्व शेतीकामांचा समावेश महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत करावा. हे शक्य नसल्यास तेलंगणाच्या धर्तीवर एकरी १० हजार रुपयांची मदत देण्यात यावी. रासायनिक खतांप्रमाणे सेंद्रिय तसेच मेंढी खतालादेखील अनुदान देण्याची तरतूद करण्यात यावी, दुधातील भेसळ रोखत गाईच्या दुधाला ५० रुपये तर म्हशीसाठी ६० रुपये प्रतिलिटर असा दर निश्चित करावा. कांद्याचे दर स्थिर राहावेत याकरिता ४० रुपये दर होईस्तोवर निर्यात बंदी लागू करू नये, अशा मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा तिसरा दिवस आहे.

### खोळंबलेला पगार एका क्षणात बँकेत जमा




जनार्दन परसराम राऊत, वनी तालुका चांदूरबाजार जिल्हा अमरावती यांनी आज जलसमाधी आंदोलनात सहभाग घेताच जलसमाधीस्थानिक प्रशासनाने त्यांच्या मागील सहा महिन्याचा खोळंबलेला पगार एका क्षणात बँकेत जमा केला,बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या यशस्वीतीला सुरुवात झाली असल्याची चर्चा यावेळी परिसरात जोर धरू लागली आहे.

### अनेक गटांचे मिळताहेत जाहीर पाठिंबे

शिवसेना ठाकरे गटाने बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. दर्यापूर मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार गजानन लवटे यांनी गुरूकूंज मोझरी येथे पोहचून उपोषणस्थळी बच्चू कडू यांची भेट घेतली. त्यांच्या समवेत संपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी हेही होते. आंदोलनाच्या प्रत्येक पायरीवर बच्चू कडू यांची साथ देण्याचा निर्णय गजानन लवटे यांनी जाहीर केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत बच्चू कडू यांची भेट घेणार असल्याचे संकेत गजानन लवटे यांनी दिले.तर माजलगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी हि बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला त्यासोबतच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रविकांत तुपकर यांनी हि आपला पाठिंबा जाहीर केला आहे. शिवसेना उबाठा गटाचे आमदार नितीन बाप्पू देशमुख हे उद्याला गुरुकुंज मोझरी मध्ये दाखल होणार आहेत. माजी मंत्री आ. विश्व्जीत कदम यांनीही आपला पाठींबा बच्चू कडू यांना दिला आहे. तर धाराशिव लोकसभा मतदार संघाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी अन्नत्याग आंदोलनास पाठिंबा दिला आहे.धाराशिव विधान सभा मतदार संघाचे आ. कैलास पाटील यांनीही बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनास जाहीर पाठिंबा दिला आहे.

# ‘सिंदूर’मध्ये खुलला देशभक्तीचा रंग; औषधी वनस्पती, नर्सरीमध्ये रोपांची मागणी वाढली

**अरुण जोशी**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

भारतीय सैन्याच्या ऑपरेशन सिंदूरने लोकांच्या हृदयात देशभक्ती निर्माण केली आहे. देशभक्ती आणि जागरूकतेचे प्रतीक बनलेल्या ‘सिंदूर’चा परिणाम नर्सरीमध्येही दिसून येत आहे. पर्यावरण दिनानिमित्त, ५ जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिंदूरचे रोप लावले होते. त्यानंतर अमरावतीकर नागरिकांनी या झाडाची माहिती घेत त्याच्या रोपांची मागणी नर्सरीत, तसेच वन विभागांकडेही करायला सुरुवात केली आहे.

एका नर्सरी चालकांनी सांगितले की, अगदी काही महिन्यांपूर्वी वर्षभरात केवळ २०० सिंदूर रोपे विकली जात होती. आता ऑपरेशन सिंदूरनंतर तसेच पर्यावरण दिनानंतर मात्र याच्या विक्रीत मोठी वाढ झाली आहे. आता दररोजच लोक ही रोपे खरेदी करत आहेत. हे लक्षात घेता, वन विभागाने मोठ्या प्रमाणात नवीन सिंदूर रोपे लावण्याची योजना आखली आहे.

### औषधी दृष्टिकोनातूनही खूप उपयुक्त

आयुर्वेदात, सिंदूरची वनस्पती ही दाह-विरोधी, अँटिऑक्सिडंट आणि पचन सुधारणारी मानली जाते. सिंदूरच्या बिया, पाने, फळे आणि साल अनेक रोगांवर औषध म्हणून वापरली जातात. त्याच्या बियांपासून बनवलेला रंग नैसर्गिक अन्न आणि सौंदर्यप्रसाधन रंग म्हणूनदेखील वापरला जातो.

### महाराष्ट्र, हिमाचल, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशात लागवड

सिंदूरचे वैज्ञानिक नाव बिक्सा ओरेलाना आहे, जे बिक्सीसी कुटुंबातील एक वनस्पती आहे. याला कुमकुम ट्री किंवा कमील ट्री असेही म्हणतात. संस्कृतमध्ये याला रक्तपुष्प असेही म्हणतात.


भारतात या वनस्पतीची लागवड हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगड आणि उत्तर प्रदेशमधील काही भागांमध्ये केली जाते. मध्य प्रदेशमध्येही याची लागवड केली जाते.सिंदूरच्या बियांपासून मिळणारा लाल-नारिंगी रंग हिंदू विवाहित महिला त्यांच्या भांगामध्ये सिंदूर म्हणून लावतात, जे शुभ मानले आहे. लिपस्टिकमध्ये वापर केला जात असल्याने काही भागांमध्ये याला लिपस्टिक ट्री असेही म्हणतात.

# हरिसाल वनपरिक्षेत्रात वाघाची दहशत अद्यापही कायमच

## शेवरीमुंडा वनक्षेत्रात पुन्हा वाघाने तीन गाईं केल्या फस्त पशुपालकांना वनविभगाचा मदतीचा हात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०धारणी**

गुगामल वन्यजीव विभाग अंतर्गत येणाऱ्या हरिसाल वनपरिक्षेत्रातील शेवरी मुंडा वनक्षेत्रात मागील आठवड्यात वाघाने मुन्नू जावरकर या साठ वर्षे वृद्धा ची शिकार करून फक्त त्यांचे हाडाचे अवशेष शिल्लक ठेवले होते तीच वाघाची दहशत पुन्हा कायम असून पुन्हा त्याच परिसरात हरिसाल गावातील दोन पशुपालकांच्या तीन गाई वाघाने फस्त केल्याची माहिती पशुपालका सह वनविभागाकडून मिळाली आहे





गुगामल वन्यजीव विभाग अंतर्गत येणाऱ्या हरिसाल वनपरिक्षेत्रातील हरिसाल ते चौराकुंड गावाकडे जाणाऱ्या रस्त्याने शेवरीमुंडा वन क्षेत्रात मागील आठवड्यात मुन्नू जावरकर या साठ वर्षीय वयोवृद्धाची वाघाने शिकार करून त्याचे फक्त हाडाचे अवशेष जंगलात शिल्लक ठेवले होते त्या शिकारीचे आदिवासी बांधवांच्या डोळ्यातून अजूनही पारणे फिटले नाही त्याच्याच दुसऱ्या दिवशी गुरुवारला हरिसाल येथील पशू पालकानी त्यांची जनावरे चरांई करीता जंगलात नेले असता पशुपालक रमेश गोसाजी शनवारे यांच्या मालकीच्या दोन गाई तर नानुबाई रघुनाथ पंडोले यांची एक गाय वाघाने फस्त केल्या आहे या घटनेची माहिती दोन्ही पशुपालकांनी शनिवारला हरीसाल वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयात दिली आहे त्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी ,वनपाल यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली केली असता तेथे त्यांना तीन गाईची शिकार केल्याची आढळून आले हरिसाल परिसरातील काही गावांमध्ये त्या नरभक्षी वाघाची दहशत अजूनही कायम असून वनविभाग त्याबाबत काय पवित्रा घेतात याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे

वाघाने शेवरी मुंडा परिसरात तीन गाईची शिकार केल्याची दोन पशुपालकांनी माहिती दिली त्यानुसार घटनास्थळी जाऊन पाहणी करून त्याचा पंचनामा करण्यात आला आहे त्यांच्या जनावरांचे झालेले नुकसान वनविभागाकडून त्यांना देण्याची अंतिम कारवाई सुरू आहे

**राजेश धुमाळे**
**वनपाल हरिसाल वनपरिक्षेत्र.**

# पं. स.भातकुली च्या वर्ग १ ली च्या तीन दिवसीय प्रशिक्षणाला सुरुवात : भातकुली मधिल ८०शिक्षक सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**



पं. स.भातकुली अंतर्गत वर्ग १ च्या मराठी माध्यमाच्या तीन दिवसीय प्रशिक्षणाला गोल्डन किड्स विद्यालय,अमरावती येथे सुरवात झाली आहे.सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वर्ग १ ली ला शिकविणाऱ्या शिक्षक बंधू भगिनी यांच्या करिता या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.या शैक्षणिक वर्षा पासुन सीबीएससी प्यार्टन लागु झाला आहे.या नविन अभ्यासक्रम व मुल्यमापनाचे प्रशिक्षण सुरु झाले आहे.दि.९ जून २०२५ ला सकाळी ठीक १०:०० वा या प्रशिक्षणाला सुरुवात झाली, हे प्रशिक्षण ९,१० व ११ जून असे तीन दिवस चालणार आहे.रामेश्वरजी माळवे साहेब (शिक्षण विस्तार अधिकारी, पं. स.भातकुली),शकील अहमद खान सर (शिक्षण विस्तार अधिकारी, पं. स.भातकुली) उमाकांतजी सिंगरोल सर (मुख्याध्यापक, गोल्डन किड्स, विद्यालय, अमरावती)चंद्रकांतजी कडबे सर (विषय साधन व्यक्ती, पं. स.भातकुली) यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये, आनंददायी वातावरणात प्रशिक्षणाला सुरुवात झाली.या प्रशिक्षणाच्या मध्ये केंद्र प्रमुख उपस्थित आहे.पं. स.भातकुली अंतर्गत वर्ग १ ली. ला शिकविणाऱ्या जवळपास ८० शिक्षक बंधू भगिनींना हे प्रशिक्षण देण्यात येत आहे. बालगीते, कृतियुक्त गीते म्हणजे विद्यार्थ्यांच्या जिव्हाळयाचा विषय. मात्र,अधिकाऱ्यांनीही त्याविषयी आत्मीयता दाखवत, आपला सहभाग नोंदवत या गीतांवर ठेका धरला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या शिक्षण अंमलबजावणीच्या अनुषंगाने यंदापासून नवीन अभ्यासक्रमाची टप्प्याटप्प्याने राबवणूक केली जाणार आहे. त्या दृष्टीने यंदाच्या वर्षी इयत्ता पहिलीचा अभ्यासक्रम बदलणार आहे. या पार्श्वभूमीवर पहिलीच्या शिक्षकांसाठी सध्या राज्यभर प्रशिक्षण कार्यक्रम सुरू आहे.भातकुली तालुक्यातील शिक्षकांचे प्रशिक्षण सुरु आहे.

# निम्न पेढी प्रकल्पातील बाधित गावांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

## नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी प्रयत्न करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**



जिल्ह्यातील दुसरा मोठा सिंचन प्रकल्प म्हणून निम्न पेढी प्रकल्प साकारण्यात येत आहे. यातील भुसंपादनाची प्रक्रिया पार पडली आहे. सात गावातील बहुतांश नागरिकांनी पुनर्वसित गावात स्थलांतरही केले आहे. प्रकल्पातील बाधित गावांच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य देण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.जिल्हाधिकारी कार्यालयात निम्न पेढी प्रकल्पातील बाधित गावांच्या पुनर्वसन, वाढीव मोबदला आणि पुनर्वसित गावातील मूलभुत आणि नागरी सुविधांचा आढावा घेण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी मिन्नू पीएम., अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी प्रसेनजित चव्हाण, सिंचन विभागाच्या अधिक्षक अभियंता मेघा अक्केवार, तहसिलदार विजय लोखंडे, अजितकुमार येळे आदी उपस्थित होते.श्री. येरेकर म्हणाले, निम्न पेढी प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या पुर्णत्वास गती देणे आवयश्यक आहे. प्रकल्पात सुमारे ७५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा होणार असून यातून १ हजार ३०० हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. तसेच पिण्याचे पाणीही उपलब्ध होणार आहे. प्रकल्पातून शेतकऱ्यांना पाईपने पाणी पुरवठा होणार असून सुमारे ३५० किलोमीटरची पाईप लाईन टाकण्यात येणार आहे.जिल्ह्याच्या दृष्टीकोनातून निम्न पेढी प्रकल्प महत्वाचा असून प्रशासनाकडून प्रकल्प पुर्ण करण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहे. यात प्रामुख्याने बुडीत क्षेत्रातून अद्यापही स्थलांतरीत झाले नसलेल्या नागरिकांचे स्थलांतर करण्यात येणार आहे. पुनर्वसनासाठी ज्या गावांना जमीन आवश्यक आहे, त्यांची उपलब्धता करण्यात येणार आहे. ही जागा नागरिकांच्या सोयीची असणार आहे. येत्या १५ जून पर्यंत नागरिकांनी जागेचा ताबा घेतल्यास त्यांना घरकुल योजनेत समाविष्ट करून घर बांधण्यासाठी सहाय्य पुरविण्यात येणार आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून मुलभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वाढीव मोबादला म्हणून १०१ कोटींचा निधी प्राप्त झाला असून २७८ कुटुंबांना पहिल्या टप्प्यात ५७ कोटींचे वाटप करण्यात येणार आहे. प्रकल्पाचे काम पुर्ण करून यात पाणी साठविण्यात येणार आहे. त्यामुळे नागरीकांनीही प्रकल्प पुर्ण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले.

# दोऱ्याच्या सात वेढ्यानीं सुतवत सात जन्मी हाच पती मिळू दे म्हणत सुवासिनींनी केले वटवृक्षाचे पूजन

## सांसारिक आयुष्याप्रती कृतज्ञता व्यक्त करीत सुवासिनींनी साजरे केले वटपौर्णिमा उत्सवाचे पर्व

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

आज वटपौर्णिमा, व्रतधारणेचा दिवस जेव्हा आजच्या आधुनिक स्त्रीया यांच्या आयुष्यात आजचा दिवस येतो, तेव्हा अनेक प्रश्न तिच्या अंतर्मनात रुंजी घालू लागतात. ती पारंपरिक मूल्यांची बाजुही समजून घेते. पण स्वतः च्या अस्तित्वाचं, निर्णयाच आणि स्वातंत्र्यांचही महत्व जाणते. म्हणूनच, आज वटपौर्णिमा केवळ सावित्रीच्या पतीवर केलेल्या निष्ठेची कहाणी उरलेली नाही. तर ती एका स्त्रीच्या आत्मबळाची, तिच्या श्रद्धेची, तिच्या निवडींच्या सन्मानाची गोष्ट बनली आहे.ज्येष्ठ पौर्णिमा हा दिवस ’ वटपौर्णिमा ’ म्हणून साजरा केला जातो.

हे व्रत सुवासिनी आपल्या पतीला उत्तम आरोग्य लाभावे, दीर्घायुष्य प्राप्त व्हावे म्हणून करतात. शनिवारी पूजेचे तबक हाती घेऊन दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा तसेच कित्येक शतकांपासून स्त्रीयांच्या कित्येक पिढ्या वडाला प्रदक्षिणा घालत असल्याचे चित्र अमरावती शहरात आजपण दिसून आले.सप्तपदीची सात पावलं आठवत, दोऱ्याच्या सात वेढ्यानी सुतवत हाच पती मिळू दे म्हणत आल्याची अनुभूती व प्रचिती यावेळी पण दिसून आली. भारताच्या अनेक प्रदेशात सौभाग्य प्राप्तीसाठी पूजले जाते ते वडाचेच झाड! सर्वमान्य सावीत्रीचीच कथा!. सशक्त मुळे खोलवर रोवून, धीराच्या पारंब्या गोलाकार पसरून. आदिम शाश्वताचा आकार घेऊन. भारतीय संस्कृतीच्या खुणा सांगत आजही वड साद घालत असतांना महिला भगिनींनी श्रद्धा-



परंपरानुसार वटवृक्षाचे पूजन करीत प्रदीर्घ जीवन लाभलेल्या या वटवृक्षाच्या आशीर्वादानेच आमचेही आयुष्य संपन्न होऊ दे अशी यावेळी प्रार्थना केली.निसर्ग आणि मानव पूर्वीपासूनच एकमेकांचे सोबती राहिले आहेत. जल अर्थात नदी, जंगल, जमीन आणि मानव एकमेकांना पूरक होते. निसर्ग फुलवण्यात, वाढवण्यात मानवाने वेळोवेळी पुढाकार घेतला आहे.हिंदू धर्मशास्त्रानुसार वटपौर्णिमा म्हणजे हिंदू स्त्रीयांचा एक महत्वाचा सण आहे. वटवृक्ष हा भारतीय संस्कृतीचा एक भाग आहे. वटपौर्णिमा हा सण याच झाडाशी संबंधित आहे. हा उत्सव महाभारतात वर्णन केलेल्या सावित्री आणि सत्यवान यांच्या आख्यायीकेवर आधारित आहे. वटपौर्णिमे च्या दिवशी ज्येष्ठ पौर्णिमेला हा सण साजरा केला जात असताना सुवासिनींनी परंपारिक वेशभूषा धारण केली होती. पतीला दीर्घायुष्य व उत्तम आरोग्य लाभावे ही प्रार्थना करीत यावेळी सुवासिनींनी ही एक प्रथा, परंपरा असली तरी निसर्गाप्रती व आपल्या सांसारिक आयुष्याप्रती कृतज्ञता हाच सांस्कृतिक भाव असल्याची यावेळी प्रचिती आणून दिली होती. वडाच्या झाडाला अक्षयवृक्षही म्हणतात. अक्षय्य म्हणजे ज्या वृक्षाचा कधीही क्षय होत नाही.मुबलक प्रमाणात प्राणवायू देणाऱ्या या वृक्षाचे महत्व लक्षात घेता सात जन्मी हाच पती मिळावा अशी प्रार्थना करीत यावेळी सुवासीनींनी अन्य वृक्षाप्रमाणे वटवृक्षाचे संवर्धन व जतन करण्याच्या सुद्धा याप्रसंगी निर्धार व संकल्प केल्याचे दृश्य दिसून आले.